महाराष्ट्र शासन MSBSVET, MSSDS, YCMOU, ITS, Skill India मान्यता प्राप्त
पाटील इलेक्ट्रॉनिक्स् इन्स्टिट्यूट
Email : patilinstitutesatara@gmail.com
महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ, मुंबई बोर्डाच्या कोर्सेसना प्रवेश
सर्टीफिकेट कोर्सेसना प्रवेश : पात्रता - १० वी, १२ वी पास/नापास व कॉलेजचे विद्यार्थी
- इलेक्ट्रिकल सुपरवायझर
- इलेक्ट्रिकल वायरमन
- टू-व्हीलर मेकॅनिक
- A.C. मेकॅनिक
- कॉम्प्युटर ऑपरेटर
- ऑटोमोबाईल टेक्निशियन
- मोटार वायडिंग
- फोर व्हीलर मेकॅनिक
- वेल्डर / प्लंबर
- कॉम्प्युटर हार्डवेअर

एस. टी. पास, लायसेन्स व प्लेसमेंटची सोय
प्लॉट नं. ११, राधिका रोड, एस.टी. स्टॅण्डजवळ, सातारा.
प्रवेशासाठी संपर्क : ९८२२०९७०७१

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...
दारू... अंमली पदार्थ...
गॅरंटेड सुटण्यासाठी...
व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र
फोन: 9552619752
कॉल/व्हॉटस्‌अ‍ॅप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक ११४ वा | रविवार, दि.३० नोव्हेंबर २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# आम्ही मोहोळचा सर्वांगीण विकास करत आलो आहोत आणि ते केवळ राजकारण म्हणून टीका करत आले आहेत : राजन पाटील

## यापुढील काळातील गतिमान विकासासाठी भाजपच्या उमेदवार शीतल क्षीरसागर यांच्यासह सर्व उमेदवारांना विजयी करा

## ज्येष्ठ भाजप नेते राजन पाटील यांचे मोहोळ मधील सभेत आवाहन

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** ग्रामपंचायत कालावधीपासून ते नगर परिषदेपर्यंत आणि नगर परिषदेच्या पहिल्या सत्तेपासून ते आजतागायत केवळ आणि केवळ मोहोळच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही झटत आलो आहोत. मोहोळमधील गेल्या दहा वर्षाच्या विकासात्मक जडणघडणीमध्ये निर्णयक्षम योगदान दिल्याचे कृतार्थ समाधान मनाला आहे. मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री ना.जयकुमारभाऊ गोरे यांच्या सार्थ संकल्पनेतून जिल्ह्यात होत असलेल्या विकास प्रक्रियेमध्ये मोहोळचा देखील समावेश होणे आवश्यक आहे.त्यामुळे मोहोळ शहरातील सुजाण जनता यावेळी निश्चितपणे भारतीय जनता पक्षाची विचारधारा स्वीकारून नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शितल सुशील क्षीरसागर



यांच्यासह भाजपाच्या सर्व अधिकृत उमेदवारांना कमळ चिन्ह समोरील बटन दाबून विजयी करून विकासाची महत्त्वपूर्ण संधी पुन्हा देईल असा विश्वास मोहोळचे माजी आमदार तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते राजन पाटील यांनी मोहोळ येथील प्रचार सभेत व्यक्त केला.

### माजी आमदार यशवंत माने यांनीही मनोगतातून भाजप सोबत राहण्याचे केले आवाहन

मोहोळ शहरात गत नऊ वर्षात झालेला विकास जनता विसरू शकणार नाही. माझ्या आमदारकीच्या कालावधीत तब्बल ४२ कोटी रुपयांच्या योजनेच्या माध्यमातून शहराच्या सर्वांगीण पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्याबरोबर शहरातील अंतर्गत गटार व्यवस्थापनाचे देखील मोठे काम होत आहे. त्यामुळे मोहोळ शहर हे पुढील पन्नास वर्षाच्या दृष्टीने विकासासाठी सज्ज होत असल्याचे समाधान वाटत आहे. या पुढील काळातही पालकमंत्री जयकुमार भाऊ गोरे आणि माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली ही विकासधारा अशीच अविरतपणे सुरू ठेवण्यासाठी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शीतल क्षीरसागर आणि भाजपाच्या सर्व उमेदवारांना विजयी करून विकासाची संधी द्यावी.

– **यशवंत माने,** माजी आमदार मोहोळ

मोहोळ येथे भारतीय जनता पक्षाच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार शितल सुशील क्षीरसागर आणि अन्य भाजपा उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेमध्ये मार्गदर्शन करताना राजन पाटील बोलत होते यावेळी राजन पाटील यांनी टीका टीप नी टाळत विरोधकांवर उपहासात्मक भाषेत टीका करत भाजपासोबत राहून विकासाच्या मार्गावर वाटचाल करत राहण्याचे आवाहन शहरवासीयांना केले. यावेळी व्यासपीठावर



जिल्हाध्यक्ष शशिकांतनाना चव्हाण, माजी आमदार यशवंत माने, नागनाथ भाऊ क्षीरसागर नगराध्यक्षपदाच्या उमेदवार शितल क्षीरसागर,तालुकाध्यक्ष सतीश काळे निवडणूक प्रभारी सुशील भैया क्षीरसागर, सोमेश क्षीरसागर, सुरेश राऊत, संजीव खिलारे, प्रकाश चवरे, विकास वाघमारे रमेश माने यांच्यासह भाजपाचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी आमदार राजन पाटील म्हणाले की व्यक्तीद्वेषाने पछाडलेल्या विरोधकांना जी काय टीका टिप्पणी करायची ती करा, त्याला माज्या शुभेच्छा राहतील. आणि याही पुढे त्यांनी याहीपेक्षा मोठ्या जोरात आमच्यावर टीका टिप्पण्या कराव्यात. आम्हाला टीका टिप्पणी करता येत नाही, कारण आमच्यावर संस्कार आहेत. त्यामुळे आम्ही टीका टिप्पणीमुळे नाराज होणार नाही. तुम्ही जितक्या टीका टिप्पण्या कराल, तेवढा आमचा उत्साह वाढणार आहे. तुमच्या टीका टिप्पण्या सदैव शहराच्या व तालुक्याच्या विकासासाठी फलदायी ठरतील अशा अशा शब्दात उपाहासात्मक टीका केली.

# मोहोळवासियांना मान्य असलेल्या शाश्वत विकासाचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या सर्व अधिकृत उमेदवारांना विजयी करा

## जेष्ठ नेते दिपक गायकवाड यांचे आवाहन

## मोहोळ मधील दत्त नगर येथील कॉर्नर बैठकीला मोठा प्रतिसाद

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** ग्रामपंचायत कालावधीत मोहोळ शहराच्या सर्वांगीण विकासामध्ये आजवर शिवसेनेने विविध स्वरूपाचे योगदान दिले आहे. मात्र यापुर्वीच्या सत्ताधाऱ्यांनी असमाधानकारक कार्यपध्दतीने शहराबाहेरील राजकीय रिमोट कंट्रोलद्वारे नगरपरिषदेचा कारभार केल्यामुळे यापुर्वीच्या सत्ताधाऱ्यांबद्दल सर्वांच्याच मनात नाराजी आहे. सर्वसामान्य शहरवासियांच्या मनातील शाश्वत आणि सर्वांगीण विकासाचे स्वप्न पुर्ण करण्यासाठी या निवडणुकीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मशाल चिन्हासमोरील बटन दाबून या प्रभागातील उमेदवार नागेश रामदास थिटे आणि शबाना बाबाजान शेख यांना आणि नगराध्य पदाच्या अधिकृत उमेदवार उज्वला अमर कांबळे यांना मोठया मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन शिवसेनेचे जेष्ठ नेते दिपक मेंबर गायकवाड यांनी केले.

शिवसेनेचे उबाठाचे उमेदवार नागेश रामदास थिटे यांच्यासह अन्य अधिकृत उमेदवारांच्या प्रचारार्थ दत्त नगर येथे आयोजित कॉर्नर सभेमध्ये मार्गदर्शन करताना जेष्ठ नेते दिपक




आजवरच्या राजकीय वाटचालीमध्ये जेष्ठ नेते दिपक मेंबर गायकवाड हे माझे आदर्श नेते आहेत. माझ्या पक्षनिष्ठेची दखल घेऊन मला मिळालेल्या उमेदवारीच्या संधीचे सोने प्रभागाच्या सर्वांगीण विकासाच्या स्वरूपात करून या प्रभागावार शिवसेना उबाठा पक्षाचा झेंडा कायमस्वरूपी फडकविल्या शिवाय आम्ही सर्व शिवसैनिक स्वस्थ बसणार नाही. प्रभागातील सर्व–सामान्य जनतेची साथ असल्यामुळे आमचा विजय निश्चित आहे.

गायकवाड बोलत होते. यावेळी बोलताना दिपक मेंबर म्हणाले की, मोहोळ शहरातील रस्ते, पाणी, आरोग्य, वीज या मुलभूत सोयी–सुविधांसाठी नगरपरिषदेमध्ये चांगले लोक प्रतिनीधी निवडुण जाणे गरजेचे आहे. ग्रामपंचायत कालावधीमध्ये शिवसेनेने केलेली कामे आजही लोक विसरले नाहीत त्यामुळे शहरातील संपूर्ण जनता शिवसेना उबाठा पक्षाच्या मागे उभे राहून नगराध्यक्ष पदाच्या उमेद्वार उज्वला कांबळे या प्रभाग क्रं. आठ मधील नगरसेवक पदाचे उमेदवार नागेश थिटे, शबाना शेख यांच्यासह पक्षाच्या सर्व अधिकृत उमेदवारांना विजयी करतील असा मला विश्वास वाटतो असे यावेळी दिपक गायकवाड म्हणाले.

याप्रसंगी सत्यवान देशमुख, सोमनाथ पवार, सुहास आखाडे, डॉ. संग्राम गायकवाड, अशोक गायकवाड, शेखर कांबळे, अमर कांबळे, हर्शल देशमुख, जिब्राईल शेख, समाधान राऊत, बरकतअली शेख, ईकबाल काझी, धनंजय बनसोडे इ. सह शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# प्रभाग नऊ मध्ये प्रचाराच्या अंतिम टप्प्यात भाजपच्या उमेदवार निलावती डोके विजयाच्या उंबरठ्यावर

## डोअर टू डोअर प्रचारात अभूतपूर्व यश मिळवत डोके परिवार ठरला प्रभागात सर्वाधिक मतदारापर्यंत पोहोचणारा परिवार

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** जसजसे मतदानाची तारीख जवळ येईल तसतसे प्रभाग क्रमांक ९ मधील भारतीय जनता पक्षाच्या बाजूने होत असलेली वातावरण निर्मिती आणखीनच सकारात्मक होताना दिसत आहे. या प्रभागातून सर्वसाधारण महिला प्रवर्गातून निवडणुकीच्या रिंगणात उभ्या असलेल्या निलावती द्रोणाचार्य डोके यांच्या प्रचाराचा अंतिम टप्पा आता पूर्ण होत आला आहे. पदयात्रा त्याचबरोबर डोअर टू डोअर प्रचार, प्रभाग बैठका, कॉर्नर बैठका या माध्यमातून भारतीय जनता पक्षाच्या या प्रभागातील पदाधिकाऱ्यांनी पूर्ण प्रभाग भाजपमय करून टाकला आहे. नीलावती डोके यांच्या प्रचाराची धुरा समर्थपणे त्यांचे सुपुत्र प्रवीणनाना डोके आणि प्रभाकरदादा डोके यांच्या समवेत राहुल डोके, पोपट डोके, शहाजी डोके, राजाभाऊ डोके, विजय डोके नागेश डोके,



एकूणच या प्रचारामध्ये डोके परिवारात इतका ऊस्फुर्त प्रतिसाद अन्य कोणतेही उमेदवाराला मिळाला नाही हे संपूर्ण प्रभाग डोळ्याने पाहत आहे. प्रत्येकाला आपुलकीने बोलणे, त्यांच्याशी जिव्हाळ्याने संवाद साधत भारतीय जनता पक्षाच्या कमळ चिन्हाची विचारधारा पटवून देण्यामध्ये डोके परिवाराने यश मिळवले. विजय आता निश्चित मानला जात आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते राजन पाटील, जिल्हाध्यक्ष शशिकांतनाना चव्हाण, ज्येष्ठ नेते बाळासाहेब भाऊगायकवाड, तालुकाध्यक्ष सतीशआप्पा काळे, निवडणूक प्रभारी सुशील क्षीरसागर, यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रभागातील भाजपाचा प्रचार जोमाने सुरू असून अंतिम टप्प्यात कमळ चिन्हाने बाजी मारत विजय संपादित करण्याच्या दृष्टीने वाटचाल सुरू ठेवली आहे.

प्रदिप डोके, गणेश डोके यांनी समर्थपणे सांभाळली आहे. या सर्वांना प्रभागातील स्थानिक भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठी साथ मिळाली आहे.

निलावती डोके या शिवसेनेचे यापूर्वीचे ज्येष्ठ नेते आणि आता भाजपमध्ये आलेले माजी उपसभापती बाळासाहेबभाऊ गायकवाड, यांच्या सख्ख्या भगीनी असून त्यांनी आपल्या बहिणीच्या विजयासाठी आपली संपूर्ण ताकद या प्रभागात पणाला लावली आहे. त्यांच्या परिवारातील विक्रांत गायकवाड आणि वैभव दाजी गायकवाड यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यांनीही निलावती डोके यांच्या प्रचारासाठी प्रभागना प्रभाग प्रचाराच्या निमित्ताने चाळून काढला आहे. त्यामुळे प्रचाराच्या अंतिम टप्प्यात निलावती डोके यांच्या उमेदवारीच्या निमित्ताने एकूणच डोके परिवाराच्या राजकीय सामर्थ्याचे पारडे जड होताना दिसत आहे.

# आता प्रभाग १० मध्ये अंतिम टप्प्यातील प्रचारात भाजपच्या प्रभावामुळे 'नो रिस्क मेजर तानाजी मानेच फिक्स' वातावरण

## गाढवे –माने वस्ती परिसरासह प्रभागाच्या शहरी भागातही मतदारांना भाजपाने केले आपलेसे

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक दहा मधील प्रचारामध्ये भारतीय जनता पक्षांचे सर्वसाधरण प्रवगार्चे उमेद्वार मेजर तानाजी माने यांच्या प्रचारामध्ये शेवटच्या टप्पात अभुतपुर्व गती आली असून प्रभागातील प्रत्येक घरापर्यंत कमळ चिन्ह पोचविण्यामध्ये त्यांना यश मिळाले आहे. भाजपाचे जेष्ठ नेते तथा माजी आमदार राजन पाटील जिल्हाध्यक्ष शशिकांतनाना चव्हाण यांच्या नियोजन आणि मार्गदर्शनाखाली मेजर तानाजी माने यांचे प्रचारार्थ त्यांचे सुपुत्र डॉ. किरण माने यांनी भाजपाच्या पदाधिकारी आणि समर्थकां समवेत प्रचार यंत्रणा सक्रीय ठेवली आहे. त्यामुळे आता प्रभाग १० मध्ये अंतिम टप्प्यातील प्रचारात भाजपच्या प्रभावामुळे "नो रिस्क मेजर तानाजी मानेच फिक्स " वातावरण निर्माण झाले आहे.

सुरुवातीपासूनच प्रचाराची शिस्तबद्ध नियोजन केल्यामुळे आता प्रचाराच्या अंतिम टप्प्यात



धावपळ होताना दिसत नाही. सुरुवातीपासून पदयात्रा प्रभाग फेरी डोअर टू डोअर प्रचार प्रत्येक मतदारांना आपलेसे करून त्यांच्या समस्या जाणून घेणे यामध्ये मेजर तानाजी माने आणि त्यांच्या प्रचार टीमने यश मिळवले आहे. विशेष बाब म्हणजे या प्रभागातील विविध कॉर्नर बैठकांना देखील मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला असून

या सर्व प्रतिसादामुळे प्रभागातील वातावरण भाजपमय होताना दिसत आहे. प्रत्येक घरापर्यंत कमळ पोचल्यामुळे आता मतदारांना देखील विकासासाठी कमळ ही बाब मनोमन पटली आहे. त्यामुळे मेजर तानाजी माने यांच्या विजयासाठी या प्रभागातले सर्वसामान्य जनताच अग्रेसर झाली असून या सर्व अनुकूल वातावरणामुळे मेजर तानाजी माने यांचा विजय आता निश्चित मानला जात आहे.

या प्रभागातील भाजपाची ताकद आणि मेजर तानाजी माने यांना उमेदवारी मिळाल्यामुळे झालेली सकारात्मकता या दोन्ही बाबींचा संयुक्त मेळ परफेक्ट झाल्यामुळे या प्रभागातील राजकीय समीकरणे भाजपाच्या दृष्टीने पॉझिटिव्ह फॅक्टर बनत मेजर तानाजी माने यांचे विजयाला बळ आले आहे. भाजपाच वरिष्ठ स्तरावरून विकास निधी खेचून आणत प्रभागाचा उर्वरित विकासाचा टप्पा पूर्ण करू शकतो. पालकमंत्री जयकुमार गोरे आणि ज्येष्ठ नेते राजन पाटील प्रभागाला न्याय देऊ शकतात. त्यामुळे आता अन्य उमेदवाराला आपण प्रतिसाद दिला तर प्रभागाची अधोगती होईल या धारणेतून मतदारातील भाजपाची वोट बँक ठाम आहे. त्यामुळे आता काहीही झालं तरी पुन्हा भाजपलाच विजयी करून प्रभागाची विकासाची गंगा अविरतपणे सुरू ठेवण्याचा दृढ निश्चय मतदारांनी केल्याचे जाणवत आहे.

# प्रभाग ४ मध्ये गत दहा वषार्तील विकासकामांमुळे शाहिस्ता परवीन मुस्ताक शेख आणि दत्तात्रय खवळे यांचा विजय निश्चित

## प्रचाराच्या अंतिम टप्प्यात या प्रभागात भाजपाची विजयाच्या दिशेने मुसंडी

## विकासात्मक वाटचाल अखंडीत सुरू ठेवण्यासाठी कमळ चिन्हाला सर्वाधिक प्रतिसाद

**मोहोळ (साहिल शेख):-** मोहोळ शहराच्या पूर्व भागातील सर्वाधिक विकसित प्रभाग म्हणून अल्पावधीतच ओळख मिळवलेल्या प्रभाग क्रमांक चार मध्ये भारतीय जनता पक्षाने विजय मिळवण्यासाठी सुरुवातीपासूनच चाणाक्ष रणनीती आखली आहे. हा प्रभाग ज्येष्ठ भाजप नेते माजी आमदार राजन पाटील, माजी आमदार यशवंत माने, शहराचे ज्येष्ठ नेते शहाजान शेख, लोकनेते शुगरचे चेअरमन बाळराजे पाटील, सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांचे नेतृत्वाखाली सर्वांगीण प्रगतीच्या दिशेने आगेकूच करणारा प्रभाग म्हणून संपूर्ण शहरभर परिचित आहे. विकासाच्या पाठीशी राहणारा प्रभाग म्हणून संपूर्ण शहरात या प्रभागाची ओळख असून मोहोळ शहरातील सर्वांगीण विकास पहायचा झाल्यास प्रभाग क्रमांक चारकडे पाहिले जाते. याचे संपूर्ण श्रेय या प्रभागाचे यापूवीर्चे नगरसेवक मुस्ताकभाई शेख आणि दत्तात्रय अण्णा खवळे यांनाच प्रभागवासीय देतात.

या प्रभागातून यापूर्वीचे नगरसेवक दत्ताअण्णा खवळे आणि शाहिस्ता परवीन मुस्ताकभाई शेख



निवडणूक लढवत आहेत. दोघाही उमेदवारांचा प्रचार आता अंतिम टप्प्यात आला असून त्यांना प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. यांच्या प्रचाराला प्रभागात मोठा प्रतिसाद मिळाला. कारण यापूर्वी मोठ्या प्रमाणात विकास कामे केल्यामुळे विरोधकांना कोणत्या मुद्द्यावर मत मागावे हे सूचेनासे झाले आहे.



त्यामुळे या प्रभागातील पारडे जड झाल्यामुळे दत्तात्रयअण्णा खवळे आणि शाहिस्ता प्रवीण मुस्ताक अहमद शेख यांचा विजय निश्चित मानला जात आहे. या प्रभागात विकासासाठी मत म्हणजे कमळाला मत ही बाब पटवून दिली जात असल्यामुळे या प्रभागावर भाजपाचा झेंडा फडकणार अशी खात्री पदाधिकाऱ्यांना झाली आहे.

दत्तात्रय अण्णा खवळे यांनी यापूर्वी नगरसेवक म्हणून प्रभागाची विकासात्मक सेवा केली आहे. शाहिस्ता परवीन मुस्ताक शेख या यापूर्वीचे नगरसेवक मुस्ताकभाई शेख यांच्या सुविद्य पत्नी आहेत. मुस्ताक शेख यांच्या परिवारातील या उमेदवारीमुळे आणि त्यांना दत्ताअण्णा खवळे यांची खंबीर साथ असल्यामुळे या प्रभागाचा हा अभेद्य बालेकिल्ला सहजासहजी भेदने अन्य पक्षांना शक्य नाही. केवळ व्यक्तीद्वेषाने या दोन्ही कार्यक्षम आणि कौतुकास्पद कामगिरी असणाऱ्या नगरसेवकांना पराभूत करण्यासाठी विरोधी पक्षाचे उमेदवार सर्वतोपरी प्रयत्न करत आहेत मात्र त्यांना यश मिळताना दिसून येत नाही. केवळ विरोधासाठी विरोध म्हणून प्रभागाच्या विकासाला मारक ठरणारी हेव्यादाव्याची आणि आकसभावनेची रणनीती देखील विरोधकाकडून सुरू आहे मात्र प्रभागातील जनता त्यांच्या भूलथापांना बळी न पडता खंबीरपणे दत्तात्रयअण्णा खवळे आणि शाहिस्ता परवीन मुस्ताक शेख या उमेदवारांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे.

## संपादकीय

# कोठडीतील मृत्यू?

गेल्या काही वर्षांत देशात तपास यंत्रणांच्या ताब्यात असणाऱ्या आरोपींचे मृत्यू होण्याच्या घटना ज्या वेगाने समोर येत आहेत, त्यांनी एकंदर पोलीस प्रशासन, तुरूंग प्रशासन आणि न्यायाची प्रक्रिया या तिन्हींपुढे आव्हान उभे केले आहे.

देशाच्या बहुतेक राज्यांमध्ये पोलीस आणि इतर तपास संस्थांकडून पुरावे गोळा करण्याची, आरोपींना चौकशीसाठी ताब्यात ठेवण्याची आणि आवश्यक माहिती मिळवण्याची प्रक्रिया चालू असते. ही प्रक्रिया कोणत्याही गुन्ह्याच्या तपासाचा भाग असल्याने ती अनिवार्यही आहे. मात्र या प्रक्रियेत सर्वाधिक महत्त्वाचे तत्त्व म्हणजे तपासासाठी ताब्यात ठेवलेल्या कोणत्याही व्यक्तीचा जीव, आरोग्य आणि मानवी हक्कांचा संपूर्ण सन्मान राखणे हेच असते. एखाद्या संस्थेकडे कायदेशीर अधिकार असतात, पण त्याच वेळी त्यांच्यावर तितकीच कायदेशीर आणि नैतिक जबाबदारीही असते.

या संस्थांकडून अधिकार आणि जबाबदारी यांमध्ये समतोल साधला गेला नाही तर न्यायव्यवस्थेवरील विश्वास ढळतो आणि व्यवस्थेच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उभे राहते. देशभर ज्या प्रमाणात पोलीस कोठडीतील मृत्यूंचे अहवाल नोंदवले जात आहेत, त्यावरून तपास यंत्रणा आपल्या जबाबदाऱ्यांचे पालन पूर्णपणे करताना दिसत नाहीत हे स्पष्ट होत आहे. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अहवालानुसार 2017 ते 2022 या पाच वर्षांच्या काळात देशात 669 जणांचा कारागृहात मृत्यू झाला. हा आकडा धक्का देणारा आहे. खुद्द केंद्र सरकारच्या आकडेवारीनुसार, 2020-21 मध्ये एकट्या उत्तर प्रदेशामध्ये 451 लोकांचा कोठडीत मृत्यू झाला, तर 2021-22 मध्ये हा आकडा 501 वर पोहोचला. तपास यंत्रणा आरोपींना न्यायालयासमोर उभे करण्याच्या उद्देशाने चौकशी करत असते, परंतु संबंधित आरोपी न्यायालयापर्यंत पोहोचण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला तर मूलभूत न्यायाच्या कल्पनेलाच धक्का बसतो.

सर्वोच्च न्यायालयानेही या प्रकारांबाबत अलीकडेच कठोर भूमिका घेतली आहे. राजस्थानमध्ये अवघ्या आठ महिन्यांत 11 जणांचा पोलीस कोठडीत मृत्यू झाल्याचा उल्लेख करून न्यायालयाने या घटनांना 'व्यवस्थेवरील डाग' म्हटले आहे. इतकेच नव्हे तर अशा प्रकारचे मृत्यू आता देश सहन करणार नाही, असे स्पष्ट शब्दांत यंत्रणांची कानटोचणी केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने फटकारण्याचे मुख्य कारण म्हणजे कोठडीतील मृत्यू हे नागरिकांच्या मूलभूत अधिकारांवर थेट परिणाम करणारे आहेत. विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने 2020 च्या परमवीर सिंग सैनी विरुद्ध बलजीत सिंग प्रकरणात स्पष्ट निर्देश दिले होते की सर्व पोलीस ठाण्यांत तसेच एनआयए, सीबीआय, ईडी, नार्कोटिस कंट्रोल ब्युरो, डीआरआय आणि इतर अशा चौकशी व अटक अधिकार असलेल्या सर्व संस्थांमध्ये सीसीटीव्ही आणि रेकॉर्डिंग यंत्रणा बंधनकारक असावी, कारण हे मूलभूत हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक आहे.

या आदेशामागचा उद्देश म्हणजे ताब्यात असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर होणारी संभाव्य हिंसा, दबाव किंवा अमानवी वागणूक रोखली जावी आणि जर असा आरोप झालाच तर त्याची सत्यासत्यता तपासण्याचे विश्वसनीय साधन उपलब्ध असावे. मात्र अनेक राज्यांत या आदेशांकडे गांभीर्याने पाहिलेच गेले नाही. परिणामी, आज देशातील बहुतांश राज्यांमध्ये अनेक पोलीस ठाण्यांमध्ये कॅमेरे बसवलेले नाहीत. काही ठिकाणी कॅमेरे असले तरी ते चालू नाहीत, काही ठिकाणी रेकॉर्डिंगची यंत्रणा बंद ठेवलेली आढळते. ही स्थिती अत्यंत चिंताजनक आहे. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, ती म्हणजे पोलीस प्रशासन, तपास यंत्रणा या आपल्या ताब्यातील व्यक्तींच्या हक्कांबद्दल संवेदनशील नाहीत. कोठडीतील मृत्यूंची कारणमीमांसा केली तर तीन-चार प्रमुख कारणे दिसून येतात. पहिले कारण शारीरिक अत्याचार. अनेक वेळा चौकशीदरम्यान आरोपींकडून माहिती मिळवण्यासाठी यंत्रणांकडून वापरले जाणारे दबावाचे मार्ग अत्यंत कठोर आणि अमानवी असतात. दुसरे कारण आवश्यक वैद्यकीय सुविधांचा अभाव. तुरुंगामध्ये किंवा आपल्या ताब्यात ठेवताना तपास यंत्रणांनी संबंधित व्यक्तींची प्राथमिक आरोग्य तपासणी, औषधोपचार, मानसिक स्थिती तपासणे आणि सतत देखरेख करणे आवश्यक असते. अनेक मृत्यू या दुर्लक्षाचा परिणाम असल्याचेही दिसून आले आहे. तिसरे कारण म्हणजे आत्महत्या. मनावरचा प्रचंड ताण, भविष्याची भीती, विविध मार्गांनी येणारा दबाव किंवा चौकशीचे भय यामुळे काही आरोपी स्वतःचाच घात करतात. चौथे कारण अपघाती मृत्यू. कधी देखरेखीच्या अभावामुळे, तर कधी मूलभूत सुविधांची अनुपलब्धता असल्यामुळे हे मृत्यू घडतात.

भारताच्या नवीन दंड आणि प्रक्रिया संहितांनुसार भारतीय नागरिक सुरक्षा संहिता 2023 नुसार कोठडी दोन प्रकारची असते. एक म्हणजे पोलिसांकडून घेतली जाणारी कोठडी ज्यामध्ये 15 दिवसांपर्यंत चौकशीसाठी ठेवले जाते आणि दुसरा प्रकार म्हणजे न्यायालयीन कोठडी ज्यामध्ये आरोपीला न्यायालयीन आदेशानुसार तुरुंगात ठेवले जाते. या दोन्ही परिस्थितींमध्ये ताब्यातील व्यक्तीचे संपूर्ण संरक्षण हे अधिकाऱ्यांचे कायदेशीर कर्तव्य आहे. गेल्या 20 वर्षांत देशभरातील कोठडीत 1888 लोकांचा मृत्यू झाल्याचे आकडेवारी सांगते; मात्र, या मृत्यूंबाबत झालेल्या कारवाईची आकडेवारी पाहिली, तर 20 वर्षांत 893 प्रकरणांमध्ये पोलिसांवर गुन्हे दाखल करण्यात आले, 358 पोलिसांवर आरोपपत्रही सादर करण्यात आले; पण केवळ 26 जणांना कोठडीतील मृत्यूप्रकरणी दोषी ठरवण्यात आले आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे या दोन दशकांमध्ये कोठडीत मृत्यू झालेल्यांपैकी 60 टक्के लोकांना मृत्यूपूर्वी एकदाही कोर्टात हजर करण्यात आले नव्हते. या समस्येवर उपाय शोधताना दीर्घकालीन पावले उचलणे आवश्यक आहे.

# रासायनिक युद्धातील सर्व बळींसाठी आंतरराष्ट्रीय स्मरणदिन : मानवतेच्या अदृश्य वेदनांचा समाजशास्त्रीय साक्षात्कार

मानवजातीचा इतिहास हा प्रगतीचा, वैज्ञानिक उन्नतीचा, संस्कृती-सभ्यतेच्या निर्मितीचा इतिहास आहे असे आपण अभिमानाने म्हणतो. पण या इतिहासामध्ये ज्या रक्तरंजित पानांनी काळाचे स्मारक झाले आहेत, त्यात युद्धाचा अध्याय सर्वाधिक भयानक आहे. शस्त्र, सत्ता आणि सीमा यांसाठी झालेल्या संघर्षांनी अनेक पिढ्यांची स्वप्ने, संस्कृती, अस्तित्व आणि भविष्य नष्ट केले आहे. मात्र युद्धाच्या विकासामध्ये एक टप्पा असा आला, ज्याने मानवजातीसमोरील नैतिकतेचा पाया हादरवला तो टप्पा म्हणजे 'रासायनिक युद्ध' (Chemical Warfare) होय. आज ३० नोव्हेंबर हा दिवस जगभरात 'रासायनिक युद्धातील सर्व बळींसाठीचा आंतरराष्ट्रीय स्मरणदिन' (International Day of Remembrance for All Victims of Chemical Warfare) म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ शोक व्यक्त करण्याचा नाही, तर एका संपूर्ण सभ्यतेच्या नैतिकतेचा पुनर्विचार करण्याचा आहे. हा दिवस आपल्याला विचार करायला भाग पाडतो की विज्ञानाचा उपयोग विकासासाठी आहे की विनाशासाठी? सत्ता, साम्राज्यवाद, भू-राजकीय हितसंबंध आणि वर्चस्व सिद्ध करण्यासाठी मानवाने कोणत्या हद्दी गाठल्या आहेत?

रासायनिक युद्धाचा उगम पहिल्या महायुद्धापासून दिसतो. १९१५ मध्ये बेल्जियममधील रणभूमीवर जर्मन सैन्याने क्लोरीन गॅसचा वापर केला आणि जगाने पहिल्यांदा पाहिले की मानवांना मारण्यासाठी अदृश्य शस्त्रेही तयार होऊ शकतात. क्लोरीन, मस्टर्ड गॅस, फॉस्जीन, सारिन, टॅबून, व्ही एक्स आणि इतर नर्व्ह साधनांनी लाखो सैनिक आणि निरपराध नागरिकांचे जीवन अकल्पनीय पद्धतीने उद्ध्वस्त केले. हे शस्त्र फक्त शरीराला मरण देत नाही, तर समाजाला पिढ्यानपिढ्या अपंगत्व, कर्करोग, न्यूरोलॉजिकल बिघाड, मानसिक आघात, पर्यावरणीय नाश आणि सामाजिक विस्थापनाचे भयानक ओझे वाहण्यास मजबूर करते.

समाजशास्त्रीय परिप्रेक्ष्यातून पाहिल्यास रासायनिक युद्ध ही केवळ सैनिकी प्रक्रिया नसून सत्तेची पुनर्निर्मिती, भीतीचे सामाजिक संस्थात्मककरण आणि मानवी अस्तित्वावर अधिराज्य गाजवण्याची अमानवी प्रवृत्ती आहे. कार्ल मार्क्सच्या मते, सत्ता आणि साधनांचे केंद्रीकरण हे वर्गसंघर्ष निर्माण करते. रासायनिक शस्त्रांची निर्मिती आणि नियंत्रण हा जागतिक सत्ताव्यवस्थेतील वर्गीय वर्चस्वाचा विस्तार आहे. येथे राष्ट्रे आणि साम्राज्ये ही 'वरची सत्ता' आहेत, तर बळी पडणारी माणसे, अल्पसंख्याक, गरीब देश, निर्वासित, स्त्रिया आणि मुले ही 'शोषित वर्ग' आहेत.

रासायनिक युद्धाचा सर्वात भयानक परिणाम हा मानव देहावर दिसणाऱ्या जखमांपेक्षा मनावर उमटणाऱ्या अदृश्य जखमांमध्ये जास्त आढळतो. अनेक संशोधन दर्शवतात की रासायनिक हल्ल्यातून वाचलेल्या लोकांना आयुष्यभर नैराश्य, सामाजिक अविश्वास, ओळख गमावल्याची भावना आणि सामाजिक अलगाव अनुभवावा लागतो. युद्धानंतर समाजाच्या पायाभूत व्यवस्था, आरोग्य प्रणाली, उपजीविका, शिक्षण आणि कुटुंब व्यवस्था पूर्णपणे विस्कळीत होते. अशा परिस्थितीत समाज पुनर्बांधणी करणे ही केवळ आर्थिक नव्हे तर भावनात्मक आणि सांस्कृतिक पुनर्रचना असते.

लिंगाच्या दृष्टीकोनातून पाहिल्यास रासायनिक युद्धाचे परिणाम आणखी विषम दिसतात. स्त्रिया केवळ शारीरिकदृष्ट्या नव्हे तर सामाजिकदृष्ट्या अधिक बळी ठरतात. त्यांच्या शरीरावर रासायनिक दुष्परिणामांमुळे प्रजनन समस्या, गर्भपात, बालकांमध्ये जन्मजात दोष, वंध्यत्व आणि अनेक अदृश्य आजार उद्भवतात. युद्धानंतर समाजात असुरक्षितता वाढते आणि स्त्रियांवरील लैंगिक हिंसा, मानव तस्करी, जबरदस्तीचे विवाह आणि सामाजिक बहिष्काराचे प्रमाण वाढते. त्यामुळे रासायनिक युद्ध हा फक्त आंतरराष्ट्रीय सुरक्षेचा विषय नाही तर स्त्री-अधिकार, मानवाधिकार आणि सामाजिक न्यायाचा प्रश्न आहे.

पर्यावरणीय समाजशास्त्राच्या दृष्टीने रासायनिक युद्धाचा प्रभाव आणखी खोलवर जातो. विषारी रसायनांनी जमीन, पाणी आणि हवा प्रदूषित होते. शेती नष्ट होते, अन्नश्रृंखला बदलते, जैवविविधता नष्ट होते आणि परिणामी पर्यावरणीय असमानता निर्माण होते. गरीब राष्ट्रे आणि आदिवासी समाज हे अशा प्रदूषणाचा सर्वाधिक फटका बसणारे घटक असतात. हेच 'पर्यावरणीय अन्याया' चे ज्वलंत उदाहरण आहे. मानव इतिहासाने दुःखातून शहाणपणा शिकला असे अनेकदा म्हटले जाते, परंतु रासायनिक शस्त्रांच्या संदर्भात ही म्हण पूर्णपणे खरी दिसत नाही. १९९७ मध्ये Chemical Weapons Convention आणि नंतर Organization for the Prohibition of Chemical Weapons ची स्थापना झाली. जगातील १९० पेक्षा अधिक देशांनी रासायनिक शस्त्रबंदी संधी करारावर स्वाक्षरी केली. तरीही सीरिया, इराक-इराण युद्ध, जपानमधील टोकियो मेट्रोवरील सारिन हल्ला, आणि अलीकडच्या भौगोलिक राजकीय तणावामध्ये रासायनिक शस्त्रांचा वापर होत असल्याच्या घटना जगाला पुन्हा धोक्याची जाणीव करून देत आहेत.

समाजशास्त्र म्हणते की कायदे आणि धोरणे महत्त्वाची आहेत, पण समाजाची सामूहिक नैतिकता, संवेदनशीलता आणि सहभाग शिवाय बदल शक्य नाही. रासायनिक युद्ध थांबवण्याची लढाई केवळ सीमारेषांवर नव्हे तर शाळांमध्ये, विद्यापीठांमध्ये, आंतरराष्ट्रीय चर्चेमध्ये, धोरणनिर्मितीत, आणि मानवाधिकारांच्या जागरुकतेमध्ये लढली जात आहे.

आज या स्मरणदिनी आपण ज्या लोकांना आदर अर्पण करतो ते केवळ मृत नाहीत तर ते इतिहासाचे साक्षीदार, अन्यायाविरुद्धची चेतावणी आणि मानवतेच्या भवितव्याचा आरसा आहेत. त्यांच्या स्मृती आपल्याला सांगतात की तंत्रज्ञान वाढले, विज्ञान प्रगत झाले, पण मानवता पुरेशी प्रगत झाली आहे का? या दिवशी आपण केवळ स्मरण करत नाही तर आपण स्वतःला विचारतो की 'युद्ध जिंकून काय मिळते, जर आपण मानवता हरवतो?' रासायनिक युद्धाच्या इतिहासातील प्रत्येक मृत्यू एक प्रश्न विचारत आहे की 'विज्ञानाचा उद्देश निर्मिती आहे की विध्वंस?' आज आपण त्या सर्वांना श्रद्धांजली देऊया ज्यांनी या क्रूर युद्धाचे बळी म्हणून जग सोडले आणि त्या सर्वांना आधार देऊया जे अजूनही जिवंत आहेत पण मृत्यूइतक्याच वेदनांनी जगत आहेत. ही मानवतेच्या पुनर्जागरणाची हाक आहे. आणि या हाकेतून उमटणारा एकच संदेश आहे की 'रासायनिक युद्ध नव्हे, मानवी शांती हीच खरी जागतिक विजयाची ओळख आहे.'



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मो. ९९६०१०३५८२
bagate.rajendra5@gmail.com

## प्रबोधन

# खरे शिक्षण ते । विवेक जागवी

पाश्चात्त्य विचारवंत एच. मान यांनी केलेली शिक्षणाची एक व्याख्या चिंतनप्रेरक कमी; पण चिंताप्रेरक अधिक आहे. ते म्हणतात, 'कोणत्याही माणसाला योग्य ते शिक्षण घेतल्यानंतरच मानव म्हणता येईल. शिक्षणाशिवाय मनुष्य म्हणजे केवळ प्राणी!' त्यामुळेच जगाच्या सातशे कोटी मनुष्यांपैकी तीनशे कोटी माणसं तरी मनुष्य म्हणण्यालायक असतील काय, ही चिंता कोणाही सुबुद्ध व्यक्तीला लागणं केवळ शक्यच नव्हे, तर आवश्यकही आहे. आज जगभर शिक्षणाचा प्रचार बऱ्यापैकी झालेला आहे. प्रत्येक देश शिक्षणाला महत्त्व देतो आहे. अगदी दुर्गम प्रदेशातील आदिवासी अतिदारिद्र्यपीडित लोक, भटक्या जमाती यांचा अपवाद वगळता बहुतेक लोक प्राथमिक- माध्यमिक शिक्षण तरी घेतच आहेत. तरीही जगात माणसं कमीच आहेत, असं नाइलाजाने म्हणावं लागेल.

स्वामी विवेकानंदांचा एक विचार वरील विचाराचा छानपैकी विस्तार करणारा आहे. जगभराच्या समाजस्थितीचं निरीक्षण केल्यानंतर स्वामीजी म्हणतात, 'कुणी काही परीक्षा दिल्या वा व्याख्यानांची आतषबाजी केली की, झाला तो तुमच्या दृष्टीने शिक्षित! जे शिक्षण लाभल्याने सामान्य जनता जीवनसंग्रामाला लायक होऊ शकत नाही, जे शिक्षण चरित्रबल, परसेवा तत्परता व सिंहासारखं साहस निर्माण करू शकत नाही, त्याला काय शिक्षण म्हणायचं? ज्या शिक्षणाने माणूस जीवनात आपल्या पायांवर उभा राहू शकतो ते खरं शिक्षण.' जे शिक्षण आज शाळा-कॉलेजमधून दिलं जातं, त्यामुळे स्वामी विवेकानंदांच्या मते अजीर्णाच्या रोग्यांची जातच जणू तयार होत आहे. ते म्हणतात, 'किल्ली दिलेल्या एखाद्या यंत्रासारखं तुम्ही राबता. जन्माला आले आणि मरून गेले, या विधानाचं तुम्ही जणू मूर्तिमंत उदाहरणच आहात.'

महात्मा गांधी हे थोर शिक्षणतत्त्वज्ञ होते. आपल्या देशाची विषमतामूलक समाजस्थिती पाहून त्यांनी मूलोद्योगी शिक्षणाची (Basic Education System) गरज मोठ्या कळवळ्याने सांगितली. 'शिक्षित व्यक्तीला उद्योगीपणाचं वळण लागलं, तर तो उपाशी राहाणार नाही. परावलंबी होणार नाही आणि दैववादी, भाग्यवादी, नियतीवादी, नशीबवादी होणार नाही,' असं गांधीजींना वाटत होतं. भारतीय मनोवृत्तीचं त्यांचं आकलन आगरकरांसारखंच होतं. आगरकरांनी म्हटलं आहे की, 'आम्हा लोकांची प्रवृत्तीच अशी आहे की, ज्यावेळी आमच्या अंगणात तोफा डागाव्यात, त्यावेळी बाहेर काय चाललंय याचा आपण विचार करतो. स्वतःच्या पोटात भुकेची आग उठेपर्यंत, कधी आमच्या समाजधुरिणांनी बेकारीच्या समस्येचा गंभीरपणे विचार केला नाही आणि आता मात्र गळ्याशी आल्यावर उपाशी लेखक बेकारीचं स्वरूप समजून न घेता रकानेच्या रकाने खरडू लागलेत.' महात्माजींना अकर्मण्यतेची चीड होती. 'मूलोद्योगी शिक्षण' हाच त्यावर एकमेव उपाय होता आणि आजसुद्धा त्यांचा विचार कालबाह्य झालेला नाही.

महात्माजींच्या याच विचारावर राष्ट्रसंत तुकडोजींनी आपले विचार जीवनशिक्षण म्हणून मांडले. शिक्षणासाठी जीवन नव्हे, तर जीवनासाठी शिक्षण, हे शिक्षणाचं उद्दिष्ट व्यक्त करताना ते लिहितात, शिक्षणातची जीवनाचे काम। दोन्हींची सांगड व्हावी उत्तम । चिंता नसावी भोजनासाठी दाम। मागण्याची भीक जैसी ॥ शिक्षणातून उदरनिर्वाहाची व्यवस्था व्हावी, हा त्यांचा आग्रह लाखमोलाचा आहे. अर्थात, मुलात एखादा तरी असावा गुण। ज्याने पोट भरेल त्यात निपुण। नये संसारामाजी अडचण। कोणत्याही परी॥ म्हणजे जीवनाच्या गरजा संपूर्ण । निर्वाहाचे एकेक साधन। संबंधित विषयाचे समग्र ज्ञान। यांचा अंतर्भाव शिक्षणी ॥

राष्ट्रसंत तुकडोजी त्याही पुढे जाऊन, आत्मसंरक्षण, अन्यायपरिमार्जन, दुबळ्यांचं रक्षण, गुंडाचा सशस्त्र प्रतिकार, यासाठी समर्थ, बलिष्ठ, निर्भय, साहसपूर्ण वीरवृत्ती जोपासणाऱ्या शिक्षणाचाही आग्रह करतात. गावावर आली गुंडांची धाड । विद्यार्थी दारे लाविती धडाधड। वाडवडिलांच्या अब्रूची धिंड। काय शिक्षण कामाचे?॥ म्हणोनि पाहिजेत बलवान मुले । कुस्ती, मल्लखांब खेळणारे भले । धडाडीने प्रतीकारार्थ धजले । तरीच शिक्षण उपयोगी ॥ आज अभ्यासक्रमात समाजोपयोगी विषयांचा अभाव दिसून येतो. ग्रामविकास, सहकार, पाककला, कृषिजीवन, समाजसेवा, व्यसनमुक्ती, दारिद्र्यमुक्ती, मैत्रीशास्त्र, लैंगिकशास्त्र, कला, स्वाद, निसर्गोपचार, योगशास्त्र असे कितीतरी जीवनोपयोगी विषय विद्यार्थ्यांच्या अभ्यासात समाविष्ट करणं अत्यावश्यक आहे. वसतिगृहयुक्त शिक्षणाचा विचार आपल्या देशाने अद्यापि स्वीकारलेला नाही. छत्रपती शाहूंनी वसतिगृहाची मोहीम राबवली नसती, तर महात्मा फुले यांच्या कार्याचा आज जो प्रचार दिसतो, तितका झाला नसता. तुकडोजीसुद्धा वसतिगृहयुक्त शिक्षणाचे समर्थकच आहेत. ते सूचना करतात, जन्म देण्याचे काम मातापित्यांचे । शिक्षणाचे काम विद्यागुरूचे। तेथे आसक्तीने पुत्रधन देशाचे । बिघडवू नये लाडावोनी। आदर्श शिक्षणपद्धतीने आदर्श देशनिर्मिती, आदर्श मानवनिर्मिती होईल, हेच खरे ! कारण-

खरे शिक्षण ते । विवेक जागवी
करी बुद्धिजीवी । माणसाला ॥१
सद्भाव जागवी । ते खरे शिक्षण
पशुत्वापासून । दूर ठेवी ॥२
जगणे सुलभ । व्हावे शिकल्याने
जोडावीत मने । समाजाची ॥३
हिंसा, क्रौर्य, घात । यांना ठेवी दूर
प्रेमा आणि पूर। तीच विद्या ॥४
सेवाभावनेला । सर्वोच्च मानते
शिक्षण असे ते । सर्वोच्च की ॥५
अपूर्ण माणसा । करितसे पूर्ण
शिक्षण ते धन्य । सर्वकाळी ॥६
दारिद्य, शोषण । गुलामीनाशक
हवे संजीवक । ज्ञान आता ॥७
अशा शिक्षणाने । जिणे धन्य व्हावे
समाजाला व्हावे । हितकारी ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# सोलापुरातील पिण्याचे पाणी आणि तरुणांचे नौकरीचे प्रश्न सोडविण्याला प्रथम प्राधान्य देणार - अण्णा बनसोडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गेल्या तीन दिवसापासून आपण सोलापूर शहराच्या दौऱ्यावर होतो. आगामी सोलापूर महानगरपालिकेच्या पार्श्वभूमीवर शहरातील २६ प्रभागात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून नागरिकांनी अंतर्गत रस्ते, पिण्याचे पाणी यासह गटारी, उद्योग व्यवसाय नसणे, परिणामी बेरोजगारी या प्रश्नांचा भडीमार केला आहे. त्यामुळे आपण राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना तीन दिवसातील घडामोडींचा अहवाल देणार आहोत. शिवाय सोलापूरसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पिण्याच्या पाण्याचा तसेच तरुणांना नौकरी व बेरोजगारांना रोजगार देण्याबरोबरच महत्त्वाची कामे पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची मागणी करणार असून पिण्याच्या पाण्याचा व तरुणांना नौकरी हे प्रश्न सोडविण्याला प्रथम प्राधान्य देणार असल्याचे विधानसभेचे उपाध्यक्ष आणि राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी शुक्रवारी बाळे येथील राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार यांच्या फार्म हाऊसवर झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.



सोलापूर शहरात पहिल्या दिवशी आलो, त्यावेळेस विविध भागात भेटीत देत असताना बरेचसे अनुभव आले. मात्र त्यानंतरचे दोन दिवस शहरातील एकूणच वातावरण पाहता आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत १०० टक्के अबकी बार ७५ पार झालेले दिसेल, असेही बनसोडे यावेळी बोलताना म्हणाले.

भारतीय जनता पार्टीची सोलापूर महापालिकेत सत्ता असताना सुद्धा रोजंदारी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सुटलेला नाहीत. पिण्याचे पाण्याचा प्रश्न जैसे तेच आहे. रोजगाराचा मोठा प्रश्न या ठिकाणी दिसून येतो. ठीकठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य आहे. या प्रश्नाला म्हणावी तशी गती मिळालेली दिसत नाही.याच प्रमुख मुद्द्यावर येणारी महापालिका आपण स्वबळावर लढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

सोलापूर शहरात एमआयएमचे एकूण ९ नगरसेवक असून सहा नगरसेवक राष्ट्रवादी पक्षात आले आहेत. उर्वरित तीन नगरसेवकांपैकी एका नगरसेवकाच्या घरी आपण सदिच्छा भेट दिली आहे. उर्वरित दोघांशीही संपर्क सुरू आहे. सोलापूरचे चित्र निश्चितच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बदलताना दिसेल. अजितदादा पवार हे राज्याचे उपमुख्यमंत्री असून अर्थमंत्रीसुद्धा आहेत.त्यामुळे निधी देताना अजितदादा निश्चितच राष्ट्रवादी पक्षाच्या नगरसेवकांचा विचार करतील, असेही बनसोडे म्हणाले. सोलापूर शहरातील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच एमआयएमच्या नेते मंडळींनी सुद्धा विकास कामासाठी निधीची मागणी पत्राद्वारे आपल्याकडे केली आहे. निश्चितच अजितदादा पवार यांच्याकडून निधी देण्याला आपण प्राधान्य देऊ,असे अण्णा बनसोडे यांनी सांगितले.

सोलापुरात नोकऱ्या नाहीत, हाताला काम नाही,म्हणून सोलापुरातील तरुण मोठ्या प्रमाणावर पुण्यात हिंजवडीमध्ये नोकरी करत आहेत. इतक्या वर्षात सोलापूरकरांचा बेरोजगारीचा प्रश्न सुटणे महत्त्वाचे होते, परंतु त्याकडे राजकारणी मंडळींनी फारसे गांभीयार्ने पाहिलेले दिसत नाही. सोलापूर हे आयटी हब होणे गरजेचे होते. कारखान्यांमध्ये सुद्धा तरुणांना नोकरी मिळणे आवश्यक होते. परंतु दुर्दैवाने ते होऊ शकलेली नाही. त्यामुळे बेरोजगारीचा मोठा प्रश्न सोलापुरात भेडसावत आहे. सोलापूर महानगरपालिकेमध्ये मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना अनेक वर्षापासून पदोन्नती दिलेली नाही. रोजंदारी कर्मचाऱ्यांचा मोठा प्रश्न या ठिकाणी निर्माण झाला आहे. हे प्रश्न सोडविण्याला आपण प्राधान्य देणार असल्याचे अण्णा बनसोडे म्हणाले.

सोलापूर शहरामध्ये नेमकी कोणती कामे केली पाहिजेत, कोणत्या पद्धतीने सोलापूरचा विकास झाला पाहिजे, याबाबत चर्चा झाल्यानंतरच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी आपणास सोलापूरचे सहसंपर्क मंत्री म्हणून नेमले आहे. सोलापूर महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले तर निर्माण झालेले सर्व प्रश्न निश्चितच सुटणार आहेत,असेही ते म्हणाले. संपूर्ण राज्यातील २२ महानगरपालिकेमध्ये प्रशासक आहे. जवळपास आठ ते नऊ वर्षे निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे प्रशासक असल्यानंतर म्हणावा तसा विकास होत नाही. त्यासाठी स्थानिक जनता किंवा नगरसेवकच असणे गरजेचे आहे. प्रभागातील अडचणी या लोकप्रतिनिधींनाच माहिती असतात, अधिकाऱ्यांना त्या माहिती असण्याचे कारणच नाही. कारण ते प्रशासकीय पातळीवर काम करत असतात.त्यामुळे लोकशाही पद्धतीने निवडणुका झाल्यानंतर निवडून येणारा लोकप्रतिनिधी आपापल्या भागाचा विकास करू शकतो,असे अण्णा बनसोडे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादीचे शहर - जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, आनंद चंदनशिवे, प्रदेश चिटणीस आनंद मुस्तारे, ज्येष्ठ नेते तौफिक शेख,नूतन गायकवाड, चित्रा कदम, प्रमोद भोसले वैभव गंगणे आदी उपस्थित होते.

### राष्ट्रवादीचे कार्यालय स्वःमालकीच्या जागेत !

सोलापूर शहरामध्ये अजितदादा पवार राष्ट्रवादीचे स्व : मालकीचे संपर्क कार्यालय नसल्याबाबतच्या प्रश्नाला उत्तर देताना अण्णा बनसोडे म्हणाले, सरकारी जागेत अजितदादा पवार राष्ट्रवादीचे कार्यालय असण्यापेक्षा स्वःमालकीच्या जागेत राष्ट्रवादीचे कार्यालय होण्यासाठी आपण सर्वाधिक प्रयत्न करत आहोत. लवकरच सोलापुरात स्व :मालकीच्या जागेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोलापूर शहराचे कार्यालय दिसेल, असे सहसंपर्क मंत्री बनसोडे यांनी पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला ठामपणे उत्तर देताना सांगितले.

# अण्णाभाऊ साठे-मरीआई चौक रेल्वे पूल पाडकामापूर्वी वाहतूक आराखड्याचा आढावा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अण्णाभाऊ साठे भैय्या चौक ते मरीआई चौक येथील रेल्वे पूल 14 डिसेंबर 2025 रोजी पाडण्यात येणार असून या कामामुळे 1 ते 1.5 लाख नागरिकांच्या दळणवळणाचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. या पार्श्वभूमीवर पर्यायी मार्गांची आखणी व नागरिकांना होणाऱ्या गैरसोयींचा आढावा घेण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी आज महत्त्वपूर्ण बैठक आयोजित केली.

बैठकीदरम्यान खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रशासनाला स्पष्ट निर्देश दिले की, 'पूल पाडकामाच्या दरम्यान नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी पर्यायी मार्ग व्यवस्थित, सुरक्षित आणि व्यवहारी असावा.' यासाठी त्यांनी पुढील पर्यायी मार्ग सुचवलाः



- मरीआई चौक नागनाथ मंदिर मार्ग रेल्वे स्टेशन आवारातील मागील रस्ता
- इराण्णा वस्ती मोदी अंडरपास मोदी पोलिस चौकी.

प्रशासनाने या मार्गाला सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने आवश्यक नियोजन करण्याचे आश्वासन दिले.

बैठकीनंतर खासदार प्रणिती शिंदे यांनी रेल्वे व महानगरपालिका अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पर्यायी मार्गाची पाहणी केली. मार्गावरील अडथळे, गर्दीचे ठिकाणे, सुरक्षिततेच्या उपाययोजना यासंदर्भात काही महत्त्वाच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

या बैठकीस सोलापूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा, महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, काँग्रेस शहर अध्यक्ष चेतन नरोटे, सामाजिक कार्यकर्ते माऊली पवार, माजी नगरसेवक विनोद भोसले, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, नगर अभियंता सारिका अकुलवार आदी उपस्थित होते.

# सत्ताधारी हे बहिरे आहेत त्यांना 'शिट्टी' च्या आवाजाने जागे करण्याची वेळ आली आहे - आ. अभिजीत पाटील

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर नगरपालिकेतील गेली 30-40 वर्ष विकास कामाच्या नावाखाली जनतेची दिशाभूल करण्यात मग्न असलेले हे सत्ताधारी सर्वसामान्यांच्या आणि अडचणी समस्या या त्यांना ऐकू येत नाहीत. अशा या बहिर्या सत्याधाऱ्यांना शिट्टीच्या आवाजाने जागे करण्याची वेळ आली आहे.

माढा तालुक्याचे आमदार अभिजीत आबा पाटील यांच्या श्री विठ्ठल परिवर्तन आघाडीच्या प्रचार शुभारंभाच्याप्रसंगी नामदेव पायरी



या ठिकाणी आवाहन करत या सत्ताधाऱ्यांना घरी बसून याची वेळ आली आहे. असे त्यांनी आपल्या प्रचार सभेतील भाषणांमधून आपले मनोगत व्यक्त केले.

पंढरपूर हे आता धुळपूर म्हणून ओळखले जात आहे. या शहरातील साधी धूळ कमी करू शकले नाहीत. त्याचप्रमाणे विकास कामाच्या नावाखाली ठेकेदारी जोपासणाऱ्या मंडळींना मोठे करणारे सत्ताधारी आता विकासाच्या गप्पा मारू लागले आहेत. सर्वसामान्य मतदार बंधू-भगिनींना या सत्ताधारींच्या भूलथापांना बळी न पडता त्यांनी श्री विठ्ठल परिवर्तन आघाडीच्या सर्व प्रभागातील उमेदवारांना प्रचंड मताने निवडून द्यावे. असे आवाहन देखील आमदार अभिजीत आबा पाटील यांनी केले.

# नळ जोडणीचे अर्ज केराच्या टोपलीत नागरिकांचे हाल

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महापालिकेच्या साधू वासवानी झोन कार्यालयातील अभियंत्यांनी नळ जोडणी साठी दाखल झालेले 200 हून अधिक अर्ज दंड होण्याच्या भीतीमुळे फेटाळून लावले आहेत. जुळे सोलापूर, कल्याणनगर, भारती विद्यापीठ या परिसरातील रहिवाशींनी नळ जोडणी साठी ऑनलाईन अर्ज केले होते हे सर्व प्रकरणे मंजूर न झाल्याने या अजार्चा पाठपुरावा करणाऱ्या नागरिकांनी गुरुवार आणि शुक्रवारी या दोन दिवसात झोन कार्यालयात गोंधळ घातला. यावेळी अर्जामध्ये त्रुटी होत्या, अर्जदार जागेवर हजर



नव्हते अशी कारणे देत अर्ज फेटाळण्यात आल्याचे सांगितले. परंतु याबाबत आम्हाला काहीही सांगण्यात आले नाही असे सांगत नागरिकांनी गोंधळ घालण्यास सुरुवात केली.

मनपा आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांनी विविध प्रकरणे प्रलंबित ठेवणाऱ्या कर्मचाऱ्यावर कारवाई सुरू केली आहे. आपल्यावरही कारवाई होईल या भीतीने कट रचत विनाकारण हे अर्ज फेटाळल्याचे दाखवण्याचा प्रताप केल्याची चर्चा सुरू आहे.या घटनेची वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेतली असून चौकशी करण्याचे आश्वासन दिले आहे.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# केवळ स्वार्थ साधण्यासाठी विरोधक नगरपालिका निवडणुकीत आहेत- प्रशांत परिचारक




**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महात्मा फुले चौक येथे भाजप आणि शहर विकास आघाडीच्या वतीने शुक्रवार दी २८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी कॉर्नर सभा आयोजित करण्यात आली.

या प्रचारसभेत माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी विरोधकांच्या स्वार्थी तसेच जातीय राजकारणावर कठोर शब्दात टीका केली. यावेळी व्यासपीठावर प्रभाग क्रमांक १७ मधील उमेदवार शंकर सूरवसे, गुरु दोडिया, संजय निंबाळकर, सुजित सर्वगौड आदी मान्यवर उपस्थित होते.

परिचारक म्हणाले, परवा नगरपालिकेत गोंधळ घातला, प्राथमिक गोष्टी माहित नसल्याने गोची झाली आणि दोष इतरांना देण्यात येत होता, येथील नगराध्यक्ष पद ओ बी सी किंवा एस सी साठी आरक्षित झाले असते तर हे विरोधक पंढरपूर कडे फिरकले पण नसते, केवळ सर्वसामान्य महिला साठी पद गेल्याने स्वार्थ साधण्यासाठी नगरपालिका निवडणूक लढवत आहेत. एकदा निवडणूक झाली की पुन्हा नॉट रिचेबल, मिस्टर इंडिया होणार, आम्ही काय पैशासाठी राजकारण करत नाही, राजकारण हा आमचा धंदा नाही.

याबरोबरच त्यांनी विरोधकांकडून होत असलेल्या अपप्रचारवर खरमरीत टीका केल्याचे पाहवयास मिळाले तर भाजपा उमेदवार व नगराध्यक्ष यांना निवडूण देण का आवश्यक आहे ते सांगताना देशात मोदी सरकार व राज्य देवाभाऊचे सरकार असल्याने पंढरपूर शहराच्या विकासासाठी लागणारा निधी हक्काने वेळ प्रसंगी भांडुन आणण्यासाठी मी प्रयत्न करणार असल्याचे ते म्हणाले. या निवडणुकीत भाजपाचे युवा उमेदवार रिंगणात उतरले आहेत त्यांना योग्य सहकार्य व मार्गदर्शन करताना पंढरपूरच्या नगरपरिषद कारभाराचा अभ्यास करण्याचा तसेच सक्षम नगरसेवक म्हणून काम करत असताना सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच आजपर्यंत अनेक प्रकारच्या शासकीय योजनेच्या माध्यमातून किती निधी आणला कोणकोणती कामे शहरासाठी केली याची माहिती त्यांनी दिली.

शहरातील झालेली विकासकामे व प्रस्तावित विकास कामे जनते समोर मांडताना पंढरपूरचा विकासासाठी पंढरपूरच्या नागरिकांनचे पाठबळ असणं आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. भविष्यात पंढरीत मोठ्या प्रमाणात भाविक येणार असून रस्ते,पार्किंग,पाणी, राहण्याची उत्तम व्यवस्था दिले पाहिजे. सुदैवानं केंद्रात आणि राज्यात आपले सरकार आहे हे सरकार चार वर्षे आहे.

# भारतातील पहिला 'युनिफॉर्म रिव्होल्यूशनरी पर्सन ऑफ इंडिया' अवॉर्ड एम. बी. रघुनाथ यांना - सतीश पवार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** युनिफॉर्म गारमेंट एक्झिबिशनची संकल्पना ज्यांनी मांडली आणि ती प्रत्यक्षात येण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केला व युनिफॉर्म क्षेत्रात नवनवीन उद्योजक निर्माण व्हावेत या उद्देशाने सुरू केलेल्या प्रदर्शनाची मूळ संकल्पना ज्यांनी मांडली त्यांना भारतातील पहिला "युनिफॉर्म रिव्होल्यूशनरी पर्सन ऑफ इंडिया" अवॉर्ड मफललाल इंडस्ट्रीजचे सीईओ एम. बी. रघुनाथ यांना माजी वस्त्रोद्योग मंत्री व आमदार सुभाष देशमुख यांच्या हस्ते देण्यात आले असल्याचे सोलापूर गारमेंट मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे अध्यक्ष सतीश पवार यांनी सांगितले.




मुंबई गोरेगाव येथील एक्झिबिशन सेंटरमध्ये आयोजित कार्यक्रमात हा अवॉर्ड प्रदान करण्यात आला. यावेळी म्हाडाचे वित्त व्यवस्थापक अजय सिंग पवार उपस्थित होते. युनिफॉर्म हे "युनिटी" म्हणजे "एकीचे" प्रतीक आहे. आणि तशी संकल्पना मांडणारे पण ते पहिले व्यक्तिमत्व म्हणून एम. बी. रघुनाथ यांचेच नाव पुढे येते.

या प्रदर्शनामुळेच नवनवीन ग्राहक प्रत्येक गारमेंट उद्योजकाला जोडले जातील त्यामुळे प्रत्येकाचा व्यवसायात वाढ होऊन प्रत्येकाची क्रयशक्ती वाढेल असे क्रांतिकारी विचार त्यांनीच मांडले होते. त्यामुळेच त्यांना हे मानाचे अवॉर्ड देण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शननुसार आम्ही गेली नऊ(०९) वर्षे एक्जीबिशन यशस्वीरित्या भरवीत आहोत.

गेली वीस (२०) वर्षापासून ते युनिफॉर्म इंडस्ट्रीत काम करीत आहेत. आणि युनिफॉर्म संदर्भात ते सतत मार्गदर्शन करतात. आज संपूर्ण महाराष्ट्रात एक हजार (१०००) उद्योजक आणि वीस हजार(२००००) रोजगार युनिफॉर्म गारमेंट क्षेत्रात निर्माण झालेले आहेत.

युनिफॉर्म गारमेंट ट्रेंड आणि यामध्ये नवीन नवीन डिझाइन्स कसे येऊ शकतात यासाठी त्यांनी प्रयत्न केले. केवळ स्कूल युनिफॉर्म कडेच लक्ष न देता कार्पोरेट सेक्टर, हॉस्पिटल्स, बँका अशा विविध क्षेत्राकडेही त्यांनी जातीने लक्ष दिले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व पदाधिकारी सदस्य अजय रंगरेज निलेश शहा, विजय डाकलिया, केतुल शहा, सतीश पवार, श्रीकांत अंबुरे, प्रकाश पवार, सुनील मेंगजी यांनी प्रयत्न केले.

# देशी बनावटीच्या पिस्तूलासह दोन जिवंत काडतुसे जप्त; एकास अटक

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी नगरपरिषद व नगर पंचायत निवडणुक-2025 च्या अनुषंगाने सोलापूर ग्रामीण जिल्हयातील निवडणुका शांततामय व भयमुक्त वातावरणामध्ये पार पाडाव्यात त्याकरीता अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण यांनी जिल्हयातील अवैध रित्या शस्त्र बाळगणारे यांचेवर लक्ष ठेवुन योग्य ती कारवाई करणेबाबत पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांना व सुचना देवुन आदेशीत केले होते.

सदर आदेशाच्या अनुषंगाने संजय जगताप स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांनी स्थानिक गुन्हे शाखेकडील अधीकारी व अंमलदार यांना सोलापूर ग्रामीण जिल्हयात अवैध रित्या शस्त्र बाळगणा-यांचे शोध घेवुन त्यांचेवर कारवाई करणेबाबत आदेशीत केले होते.

सहा. पोलीस निरीक्षक / भिमगोंडा पाटील, स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक हे सोलापूर तालुका पोलीस ठाणे अवारात हजर असताना पथकातील पोहवा / विजयकुमार भरले यांना गोपनीय बातमीदारामार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, इसम नामे हुसेनबाशा सय्यद, रा. सोलापूर हा अंगात गडद जांबळया रंगाचा शर्ट व पांढ-या रंगाची पॅन्ट घालुन सोलापूर ते विजापुर या महामार्गावर असलेल्या नांदणी टोल नाक्याच्या काही अंतरावर असलेले हॉटेल शरण बसवेश्वर च्या पुढे देशी बनावटीचे पिस्टल व राउंड सोबत बाळगुन उभा आहे. सपोनि भिमगोंडा पाटील यांनी लागलीच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री संजय जगताप यांना मिळालेली बातमी सांगितली असता, त्यांनी तात्काळ पथकासह कारवाई करण्याचे आदेश दिले. सदर बातमीच्या ठिकाणी सहा. पोलीस निरीक्षक / भिमगोंडा पाटील व त्यांचे पथक पोहोचुन हॉटेल शरण बसवेश्वर च्या पुढे एका मोटार सायकल शेजारी उभा असलेला इसमाच्या अंगावरील कपडयावरून बातमी प्रमाणे संशय आल्याने पथकाने त्यास ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमास त्याचे नांव गाव पत्ता विचारता त्याने त्याचे नांव हुसेनबाशा अ. रजाक सय्यद वय- 46 वर्षे, रा. घर नं 60 जवाहर नगर, शेळगी, सोलापूर असे असल्याचे सांगितले. सदर इसमाची झडती घेतली असता त्याचे पॅन्टीत खवलेले 1 देशी बनावटी पिस्टल व 2 जिवंत काडतुस त्याचे ताब्यात मिळुन आले आहे. आरोपी याचेकडे अधीक तपास करता सदरचे 1 देशी बनावटी पिस्टल व 2 जिवंत काडतुस हे चांद रा. कंचनाळ ता. इंडी राज्य कर्नाटक याचेकडुन घेतले असल्याचे सांगितले. सदर आरोपी विरुद्ध मंद्रुप पोलीस ठाणे गुरनं 399/2025 भारतीय शस्त्र अधीनियम 1959 चे कलम 3,25 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयात 1 देशी बनावटी पिस्टल व 2 जिवंत काडतुस व 1 मोटार सायकल असा एकुण 35,400/- रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास मंद्रुप पोलीस ठाणे करीत आहे.

नमुद उल्लेखनीय कामगिरी अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, यांचे मार्गदर्शनाखाली संजय जगताप, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, सोलापूर ग्रामीण यांचे नेतृत्वाखाली सहा. पोलीस निरीक्षक / भिमगोंडा पाटील, पोउपनि / डांगे व पथकातील पोहेकॉ सलीम बागवान, विजयकुमार भरले, पोकॉ/ प्रमोद शींपाळे, चापोकों/ दिलीप थोरात यांनी बाजवली आहे.

**विकणे /भाड्याने देणे आहे**

वासूद रोड वरील पाण्याच्या टाकीच्या उत्तरील बाजुस असणाऱ्या शिनगारे प्लॉट मधील क्लिअर टायटल प्रॉपर्टी (ट्वीन बंगलो) विकणे आहे.

**संपर्क : डी. बी. शिंदे**
**मो.: ९५७९४२१४६५ ८२७५२७४२५३**
**पत्ता:** अल्टिमेट जिमच्या समोर, सांगोला

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय
**निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# 'विकास हा आमचा धर्म'; आंबेडकर चळवळीचा ऐतिहासिक आरंभ - अण्णा बनसोडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग क्रमांक २२ च्या विकासाचा नवा इतिहास लिहिला गेला राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विशेष निधीतून, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या सक्रिय सहकार्याने रामवाडीला तब्बल १ कोटी रुपयांचा विक्रमी निधी मंजूर झाला आहे.

प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव आणि कार्यसम्राट नगरसेवक नागेश गायकवाड यांच्या सातत्यपूर्ण धडपडीचे हे फलित असून, आंबेडकरी समाजासाठी हा दिवस विकासाचा निर्णायक टप्पा ठरला. या निधीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन या दोन भव्य प्रकल्पांना प्रत्येकी ५० लाखांची भक्कम तरतूद करण्यात आली असून, या दोन्ही योजनांचे भूमिपूजन विधानसभेचे उपाध्यक्ष व राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांच्या हस्ते अत्यंत उत्साहात पार पडले. दरम्यान यावेळी रामवाडी परिसरातील श्रद्धास्थान अंबाबाई मंदिरात तुळजापूरच्या तुळजाभवानी इतकेच भक्तांची आढळ श्रद्धा असून या देवीचे अण्णा बनसोडे यांनी मनोभावे दर्शन घेतले दर्शनानंतर इच्छा भगवंताची परिवारातर्फे क्रेन द्वारे अण्णा साहेबांना भव्य हार घालून जल्लोषात स्वागत करण्यात आले "राष्ट्रवादी पुन्हा" या गाण्याच्या ठेक्यावर कार्यकर्त्यांनी निनाद करत उत्साहन शिगेला पोहोचवला. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी शहर जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, इच्छा भगवंताची परिवाराचे मार्गदर्शक तथा आधारस्तंभ लक्ष्मण मामा जाधव, प्रदेश सचिव इरफान शेख, आनंद मुस्तारे, प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, माजी नगरसेविका नूतन प्रमोद गायकवाड,




संजय भडंगे, सुनील कांबळे, जनरल सेक्रेटरी प्रमोद भोसले, महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम, शामराव गांगर्डे, पंचशीलक मंडळाचे प्रमुख सागर कांबळे, संतोष उर्फ ऋतिक गायकवाड, दीपक गायगवळी, महात्मा फुले प्रशालेचे संस्थापक गायकवाड मामा, राजू काका जाधव, शोभाताई गायकवाड, लक्ष्मी कांबळे, मीना गायकवाड, सरोजनी जाधव,प्रमिला स्वामी, योजना कामतकर, विद्यासागर उर्फ पिंटू जाधव, उत्तम कदम, बाशा शेख, श्याम जाधव, सिकंदर शेख, कोशेन कुरेशी, रवींद्र गायकवाड, डॉली जाधव, माऊली जरग, वृषभ पेटी, वसंत कांबळे, माणिक कांबळे, फिरोज पठाण, सचिन अंगडीकर आदींसह ईच्छा भगवंताची परिवाराचे सदस्य उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार किसन जाधव, नागेश गायकवाड आणि चेतन गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गौतम बुद्ध, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले आणि अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. त्यानंतर छत्रपती संभाजीनगर येथून आलेल्या भिक्खूंच्या उपस्थितीत बौद्ध स्तोत्र पठणाने संपूर्ण परिसर भारावून गेला. सर्वात भावनिक क्षण म्हणजे चिवरदान सोहळा, ज्यात अण्णा बनसोडे यांनी भिक्खूंना चिवर अर्पण करीत बौद्ध परंपरेप्रती आदर आणि सामाजिक बांधिलकी व्यक्त केली. निधीचे महत्त्व अधोरेखित करताना अण्णा बनसोडे म्हणाले, प्रभाग २२ च्या विकासाचे घोडे वेगाने धावण्यामागे जाधवझगायकवाड यांची तळमळ आहे. त्यांच्या जिद्दीमुळेच आंबेडकरी समाजाला आधुनिक, दर्जेदार सांस्कृतिक पायाभूत सुविधा मिळत आहेत. विकास आणि सर्वधर्मीयांची एकजूट हीच राष्ट्रवादीची खरी ओळख आहे.

यावेळी बोलताना किसन जाधव यांनी रमाई घरकुल योजनेतील जाचक अटी तातडीने शिथिल करून वास्तविक गरजू लाभार्थ्यांना मदत मिळावी, अशी सकारात्मक मागणी अण्णा बनसोडे यांच्याकडे केली.

तसेच प्रभागात आणखीन कोट्यवधी रुपयांचा निधी खेचून आणण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमात आणखी एक महत्त्वाचा उपक्रम पार पडला ईच्छा भगवंताची परिवाराच्या वतीने तब्बल दोन हजाराहून अधिक महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले, ज्यामुळे कार्यक्रमाला सामाजिक समतोलाचा आणि लोकाभिमुखतेचा सुंदर स्पर्श लाभला. हजारो नागरिकांच्या जंगी उपस्थितीत साजरा झालेला हा सोहळा रामवाडीच्या विकासदिशेने उचललेले सुवर्ण पाऊल ठरला.

# हरिदास रणदिवे यांची नियुक्ती

**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** अरण येथील हरिदास रणदिवे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या राज्य सरचिटणीसपदी राज्याचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी नियुक्ती केली आहे.

गोविंदबाग बारामती येथे राष्ट्रीय अध्यक्ष शरदचंद्र पवार यांनी रणदिवे यांना राज्य सरचिटणीस निवडीचे पत्र देऊन शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची ध्येयधोरणे तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवून गावोगावी राष्ट्रवादी काँग्रेस अधिक बळकट करणार असल्याचा निर्धार रणदिवे यांनी यावेळी व्यक्त केला.



निवडीबद्दल माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते- पाटील, खासदार धैर्यशील मोहिते- पाटील, माढ्याचे आमदार अभिजित पाटील, जिल्हाध्यक्ष वसंतराव देशमुख, कार्याध्यक्ष रवींद्र पाटील बोरगावकर, तालुकाध्यक्ष बाळासाहेब पाटील, भारत आबा शिंदे यांनीही रणदिवे यांचे अभिनंदन केले.

# काव्यमित्र संस्थेचा पुरस्कार सुजाता जुगदार यांना जाहीर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** काव्य मित्र संस्था, पुणेच्यावतीने देण्यात येणारा यंदांचा राष्ट्रीय कार्य गौरव पुरस्कार सोलापुरातील छत्रपती शिवाजी प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुजाता जुगदार यांना जाहीर झाला आहे.

जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार देण्यात येत असून या पुरस्काराचे यंदाचे हे २५वे वर्ष आहे. सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ असे



या पुरस्काराचेस्वरूप आहे. येत्या रविवारी, 30 नोव्हेंबर रोजी दुपारी चार वाजता पुण्यातील पिंपरी चिंचवड सायन्स पार्क येथील तारांगण ऑडिटोरिअम येथे या पुरस्काराचे वितरण मातृतीर्थ सिंदखेडराजा येथील राजे लखोजी जाधवराव यांचे १४ वे वंशज तथा स्वराज्याचे सरसेनापती धनाजी जाधवराव" ७ यांचे थेट दहावे वंशज श्रीमंत संभाजीराजे जाधवराव यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ लेखिका व कवयित्री सविता जंगम (ओतूर) या राहणार असून याप्रसंगी भोसरी येथीक उद्योजक डॉ. अशोक साळुंखे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

मुख्याध्यापिका जुगदार यांना हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अरुण मित्रगोत्री, सोलापूर जिल्हा कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले आदींनी अभिनंदन केले आहे.


**निरामय पॅरालिसिस सेंटर**
निरामय आयुर्वेद, पंचकर्म, योगा अॅण्ड फिजिओथेरपी सेंटर
ISO 9001:2015
NGO DARPAN
खात्रीशीर उपचार 100% गॅरंटी आयुर्वेदिक व अलोपॅथी तज्ञांच्या निगराणीमध्ये

कितीही जुने पॅरालिसिस असो आयुर्वेदिक व अलोपॅथी उपचार पद्धतीने पंधरा ते वीस दिवसानंतर रिझल्ट येण्यास सुरुवात होते. हात काम करत नाही, चालता येत नाही, ब्रेनचा कंट्रोल जाणे बेडवर आहात काळजी करू नका खात्रीशीर उपचार



नांत आपुलकीचं, जिव्हाळ्याचं, माणुसकीचं आणि आधाराचं समाजातील प्रत्येक घटकाशी ऋणानुबंध जपणारी संस्था
**मोबाईल नं. 9503310568**
पत्ता: गोळवलकर हॉस्पीटल च्या पाठीमागे, सुळे नगर, मोहोळ, जि. सोलापुर

## कटूसत्य शब्दकोडे




**उभे शब्द :** १) हिंदी सिनेसृष्टीतील महानायक अभिनेता २) नदीचा काठ, बाण ३) अंतराळात प्रवास करणारे वाहन, नया उलट लिहा ४) उजेड ५) साठ मिनिटांचा एक ** ६) वायू, वारा ७) दुप्पट (इंग्रजीत) ११) नोकरच्या विरूध्दार्थी, धनी १२) गन उलट लिहा १३) कर्मचाऱ्यांना मिळणारा पगार १५) एक (इंग्रजीत) १७) फोटो (हिंदीत) २१) दहा (हिंदीत) २२) श्रीरामाचा एक बंधू २३) उद्या (हिंदीत) २४) ढग (हिंदीत) २५) दशमी नंतरचा दिवस २६) दहा (इंग्रजीत) २८) थकीत येणे राहिलेली रक्कम ३०) घोड्याच्या पायाच्या खुराला ठोकतात ती अर्धवर्तुळाकार पट्टी ३३) आदर सत्कार, ** सन्मान ३४) पुण्यातील प्रसिध्द गणपती-***** हलवाई ३५) वाईट सवय ३६) आठवड्यातील एक वार ३७) मालावर भरावा लागणारा कर, टॅक्स ३८) दुधावरील मलई ४०) लहान बाळाला टोचतात ती ४२) दशरथपुत्र ४४) दात ४५) तीन दुणे ४७) शरीर (हिंदीत), दक उलट लिहा ४८) सायकलच्या चाकाच्या या भागावर टायर बसवितात

**आडवे शब्द :** १) गुढीपाडव्यानंतरचा एक सण
४) भवानीमातेचे मंदिर छ. शिवरायांनी या किल्ल्यावर बांधले आहे
८) क्रिकेटमधील धाव (इंग्रजीत) ९) सशाशी शर्यत लावणारा कथेतील प्राणी
१०) हवामानातील उष्मा १३) पोशाख, एक म्हण-जसा देश तसा **
१४) आश्चर्य १६) नजीक, समीप १८) मोफत (इंग्रजीत)
१९) पाण्यावर तरंगणारा एक पक्षी २०) घर, निवास २४) अकरा दुणे
२५) मोबाईल फोनची सेवा पुरविणारी आयडिया प्रमाणे एक कंपनी
२७) स्त्रियांचा नाकातील दागिना २९) वस्तूचे मूल्य, भाव
३०) अनेक रस्ते एकत्र येतात असे मोक्याचे ठिकाण ३१) शरीर, काया
३२) किमानच्या विरूध्दार्थी
३४) पाणीयुक्त चिखल, गाळ ३७) जीभ (हिंदीत) ३८) घर वा फर्निचरकरता या वृक्षाचे लाकूड वापरतात ३९) थंड, गार, मुलीचे एक नाव ४१) काकाची बायको
४२) एक माजी भारतीय फलंदाज-अंबाती *** ४३) वाकडातिकडा नसलेला, स्ट्रेट
४५) मस उलट लिहा ४६) शेकाप पक्षाचे पूर्ण नाव-**** कामगार पक्ष
४९) औषध (हिंदीत) ५०) पाच दुणे ५१) बारा गुणिले पाच
५२) गुजरात जवळील केंद्रशासित प्रदेश-दिव ***

## सुडोकु - 113

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | 8 | 4 | 1 | | | | 9 |
| 5 | | 1 | | 2 | | 4 | 7 | |
| | 2 | 9 | | 6 | | | | |
| | 3 | | | | 7 | 6 | 9 | 4 |
| | 4 | 5 | 3 | | | 8 | 1 | |
| 1 | | | | | | 3 | | |
| 9 | | 4 | 6 | 7 | 2 | 1 | 3 | |
| 6 | | | | | | 7 | | 8 |
| | | | 8 | 3 | 1 | | | |

# प्रभाग 10 मधील प्रचारामध्ये शिवसेना शिंदे पक्षाचे उमेदवार दौलतराव तथा बंडू देशमुख यांची विजयी आघाडी

## सहकारी उमेदवार राणीताई गोडसे यांच्या समवेत शेवटच्या टप्प्यात मतदारांशी गतिमान संपर्क सुरू

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-**मोहोळ शहराच्या पश्चिम भागातील प्रभाग क्रमांक आठ मधून शिवसेना एकनाथ शिंदे पक्षात दमदारपणे एन्ट्री करत प्रवेश केलेले बंडू देशमुख प्रचाराच्या पहिल्या दिवसापासूनच जनसंपर्क मोठ्या प्रमाणात वाढवत प्रभाग क्रमांक आठ मधील वातावरण चांगलेच तापवले आहे. आता ते यापूर्वीच्या शिवसेनेबरोबर भाजपाला देखील कडवी टक्कर यशस्वीरित्या प्रभावी जनसंपर्क च्या माध्यमातून देत आहेत. प्रभागातील स्थानिक आणि प्रत्येकाच्या मदतीला धावून जाणारा युवा चेहरा म्हणून यापूर्वीपासूनच प्रभाग क्रमांक आठ मधील जनसंपर्क वाढवला होता. प्रत्यक्ष निवडणुकीच्या प्रचारात त्यांनी प्रत्येक घरापर्यंत आणि घरातील प्रत्येक मतदारापर्यंत जाण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत शिवसेना शिंदे पक्षाचे धनुष्यबाण चिन्ह पोहोचवले आहे.

या प्रभागातील सर्व धमार्चे समाज बांधव त्याचबरोबर सर्व अन्य समाजघटकांशी बंडू देशमुख यांचा



सर्वधर्मसमभाव आणि भाईचारा स्वरूपाचा आपुलकीचा भावबंध आजही कायम आहे. त्यामुळे सर्व समाज बांधवांशी सल्लामसलत करूनच प्रचारामध्ये जोर वाढवल्यामुळे त्यांचा विजय निश्चित आहे. शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेनंतर शहरातील बदललेल्या वातावरणाचा मोठा प्रभाव या प्रभागात असल्यामुळे देशमुख यांच्या विजयाची खात्री शिवसैनिकांना झाली आहे.

युवा नेते बंडू देशमुख हे या प्रभागातील स्थानिक उमेदवार असून धनुष्यबाण चिन्हावर त्यांनी निवडणूक लढवल्यामुळे या प्रभागातील प्रस्थापित पक्षाच्या उमेदवारांचे मात्र चांगलेच धाबे दणाणत आहे. सर्वधर्मसमभाव जपण्याबरोबर सर्व समाज घटकांशी अत्यंत निकोप आणि बंधूभावाचे धोरण त्यांनी स्वीकारल्याने या प्रभागातील प्रचारात बंडू देशमुख यांचा पाठिंबा वाढल्यामुळे अनेक पक्षांना स्वतःच्या विजयाची आशा धुसर वाटू लागली आहे. आणि बंडू देशमुख यांच्या विजयाच्या शक्यतेचे पारडे जड झाले आहे.

बंडू देशमुख हे मोहोळ शहरातील दिवंगत ज्येष्ठ मार्गदर्शक शहाजीरावदादा देशमुख यांचे सुपुत्र असून त्यांच्या परिवारातील सर्व सदस्य या प्रभागाशी गेल्या अनेक दशकापासूनचा जनसंपर्क कायम ठेवून आहेत. देशमुख परिवाराचे या परिसरातील प्रत्येक सर्वसामान्यांशी आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे नाते आहे. गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेले बंडू देशमुख यांची राजकीय एन्ट्री या नगरपरिषद निवडणुकीच्या रूपाने झाल्यामुळे आता देशमुख परिवाराने आजतागायत कमावलेली माणुसकी, आपुलकी सर्वसामान्यांचे दुःख जाणून घेण्याची वृत्ती या निवडणुकीत त्यांना निश्चितपणे फलदायी ठरत आहे.

# प्रभाग 10 मधील जनतेने मनात एकच तत्व धरलंय..

## यंदाच्या निवडणुकीत अप्पांच्या चैतन्यबापूंना नगरसेवक करायचं ठरलंय..

### प्रचाराच्या अंतिम टप्प्यात शिवसेना शिंदे पक्षाच्या धनुष्यबाणाचीच मोठी हवा

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मोहोळ शहराच्या हद्दवाढ भागातील गेल्या अनेक वर्षापासूनच्या समस्या कायम राहिल्यामुळे या भागाचा समावेश असलेल्या प्रभाग क्रमांक दहा मध्ये यंदा काहीही झालं तर परिवर्तन घडवायचाच असा दृढनिश्चय झाल्याचे जणू वातावरणावरून जाणवत आहे. या प्रभागातील सर्वसामान्य जनतेने शिवसेना शिंदे पक्षाचे सर्वसाधारण प्रवगार्तील उमेदवार चैतन्यबापू देशमुख यांच्या विजयाच्या रूपाने विकासाची पहाट उगवण्यासाठी मतदानाच्या रूपातील क्रांती करण्याची पाऊले उचलली आहेत. या प्रभागातील ज्येष्ठ मार्गदर्शक पद्माकरअप्पा देशमुख यांचे सुपुत्र असलेल्या चैतन्यबापु देशमुख यांच्या प्रचाराचा




गतीवेळी केवळ नऊ मतांनी हा प्रभाग देशमुख परिवाराच्या ताब्यात येण्यापासून राहिला होता. त्यामुळे यंदाच्या निवडणुकीत ती कसर भरून काढण्यासाठी अगदी शिस्तबद्ध प्रचार यंत्रणा ज्येष्ठ नेते पद्माकर आप्पा देशमुख यांनी राबवली आहे. त्यांचे सुपुत्र प्रसाद देशमुख यांनी प्रचाराची सर्व पडद्याआडची सूत्रे स्वतः सक्षमपणे हाताळत प्रभागाला नक्की काय हवंय ?प्रभागात नक्की काय करायला हवं? चैतन्यबापूंना विजयी कसे करता येईल? यासाठीचा तंतोतंत अभ्यास बारकाईने करत प्रचाराच्या अंतिम टप्प्यापर्यंत चैतन्य देशमुखांच्या विजयासाठीची अचूक रणनीती आखल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे. प्रभागातील प्रत्येक घरापर्यंत धनुष्यबाण चिन्ह गेल्यामुळे यंदा बापूंना विजयी होण्यापासून कोणीच रोखू शकणार नाही असा दावा त्यांचे समर्थक करत आहेत.

आता अंतिम टप्पा मोठ्या जोमात सुरू असून प्रभागातील त्यांना वाढलेला प्रतिसाद पाहून सर्वपक्षीय उमेदवारांना आता शिवसेना शिंदे पक्षाच्या धनुष्यबाणाला रोखायचं कसं ? असा प्रश्न पडला आहे.

उमेदवारी दाखल केलेल्या पहिल्या दिवसापासूनच देशमुख परिवार आणि देशमुख परिवाराला मानणारा या प्रभागातील मतदार यांनी प्रचाराची अचूक निर्मिती आखत विविध अत्याधुनिक प्रचार तंत्राचा अवलंब करत प्रभागातील पाठिंबा यशस्वीरित्या मिळवला. त्यामुळे आता यापूर्वीच्या सत्ताधाऱ्यांनी विरोधात जर खरी टक्कर कोणाची होणार असेल तर ती चैतन्यबापू देशमुख यांच्या उमेदवारीशीच होणार आहे. त्यामुळे यंदा काहीही झालं तरी बापूंना नगरसेवक करून नगरपरिषदेत पाठवायचंच असा चंग प्रभागातील शिवसेना शिंदे पक्षाच्या शिवसैनिकांनी बांधल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे.

# प्रभाग नऊ मधील प्रचारात सरताज शेख यांच्या आघाडीमुळे शिंदे सेनेला प्रभाग ताब्यात घेण्याची सुवर्णसंधी

## प्रचाराच्या अंतिम टप्प्यात शिवसेना शिंदे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी केलेल्या जोरदार प्रचारामुळे लखनभाऊ कोळी विजयाच्या दिशेने





सरताज सय्यद या शिवसेना शिंदे पक्षाच्या एक सुशिक्षित आणि युवा चेहरा म्हणून निवडणुकीच्या रिंगणात आहेत. उच्च शिक्षण झालेल्या सरताज यांचे वक्तृत्व त्याचबरोबर सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्याची मनोमन जाण या बाबीच त्यांना या प्रचारात लोकप्रिय बनवताना ठरत आहेत. प्रथमच या प्रभागाला इतका उच्चशिक्षित आणि युवा चेहरा उमेदवारीच्या रूपात मिळाल्यामुळे या प्रभागातून सरताज सय्यद यांनाच विजयी करून नगरसेवक म्हणून नगरपरिषदेत पाठवायचंच असा दृढ निर्धार युवा आणि युवती मतदारांनी त्याचबरोबर महिला भगिनींनी केल्याचे स्पष्टपणे जाणवत आहे.



शिवसेनेचे उमेदवार लखन कोळी हे या प्रभागातील स्थानिक उमेदवार असून काहीही झालं तरी यंदा स्थानिक उमेदवाराला मोठ्या मताधिक्याने विजयी करून नगरपरिषद पाठवायचा निर्धार प्रभागातील जनतेने केला आहे. प्रत्येक सर्वसामान्य व्यक्तीच्या सुखदुःखात सहभागी होणारे लखनभाऊ कोळी आणि त्यांचे बंधू सागर कोळी यांचा प्रभागातील शेकडो मित्रपरिवार या निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतिम टप्प्यात अभुतपुर्व आणि गतिमान पद्धतीने कामाला लागला आहे. त्यामुळे विरोधी पक्षाच्या उमेदवारांची गाळण उडताना दिसत आहे. त्यामुळे यंदा या प्रभागावर लखन भाऊ कोळी यांच्या रूपाने शिवसेनेचा भगवा फडकण्याचे आता निश्चित मानले जात आहे.

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** प्रभाग नऊ मध्ये यंदा शिवसेनेच्या धनुष्यबाणाचा झेंडा फडकण्याचे आता निश्चित झाले आहे.शिवसेना शिंदे पक्षाचे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मोहोळ मधील सभेपासून या प्रभागातील वातावरण मोठ्या प्रमाणात बदलताना जाणवले. नगर विकास विभागाच्या माध्यमातून सरताज या भरीव निधी विकासासाठी आणून प्रभाग नऊ मधील सर्व विकासकामे मार्गी लावू शकतात. आणि स्थानिकांचे प्रश्न लखनभाऊ कोळी सोडवू शकतात अशी खात्री मतदारांना झाल्यामुळे या दोघा उमेदवारांना मोठा प्रतिसाद मिळत आहे.

मोहोळ शहराच्या दक्षिण भागातील प्रभाग क्रमांक नऊ मधील राजकीय समीकरणे दिवसें दिवस मोठ्या प्रमाणात बदलत आहेत. या प्रभागात शिवसेना शिंदे पक्षाच्या सर्वसाधारण प्रवर्गातील उच्चशिक्षित आणि युवा उमेदवार सरताज सर्फराज सय्यद यांना वाढणारा पाठिंबा दिवसेंदिवस या निवडणुकीतील निर्णायक स्थिती दर्शवत आहे. शिवाय प्रचाराच्या अंतिम टप्प्यात कार्यकर्त्यांनी केलेल्या जोरदार प्रचारामुळे दुसरे उमेदवार लखनभाऊ कोळी देखील विजयाच्या दिशेने मार्गक्रमण करत आहेत.सरताज सय्यद यांच्या प्रचारासाठी त्यांचे पती आणि शिवसेना शिंदे पक्षाचे युवा नेते सर्फराज सय्यद यांनी तर लखन भाऊ कोळी यांचे बंधू सागर कोळी यांनी पहिल्या दिवसापासून राबवलेली प्रचार यंत्रणेची रणनीती आता निश्चितपणे शिवसेना शिंदे पक्षाच्या धनुष्यबाण चिन्हाच्या विजयाला मोठा हातभार लावत आहे.

# सोलापूर जिल्ह्यातील नगरपालिकांसाठी भाजपकडून 300 कोटी रुपये आले

## आ. उत्तम जानकर यांचा मोठा आरोप

माळशिरस (कटूसत्य वृत्त):- आपल्या खळबळजनक वक्तव्याने आणि दाव्याने ओळखले जाणारे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे माळशिरसमधील आमदार उत्तम जानकर यांनी पुन्हा एकदा खळबळजनक आरोप केला आहे.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एकट्या सोलापूर जिल्ह्यातील नगरपालिकेत पैसे वाटण्यासाठी भाजपकडून 300 कोटी रुपये आले आहेत. प्रत्येक नगरपालिकेला किमान 25 कोटी रुपये, अशा पद्धतीने पैसे पक्षाकडून आले असून सर्वात भ्रष्ट असा पक्ष भाजपा आहे, असा गंभीर आरोप आमदार उत्तम जानकर यांनी केला आहे. एका बाजूला नगरपालिका निवडणुका या पैसेवाल्यांच्या झाल्याची टीका सर्वच विरोधी पक्षातून होत



असताना आज जानकर यांनी थेट भाजपने जिल्ह्यासाठी 300 कोटी रुपये पाठवल्याचा आरोप केला आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला असता नेते मंडळींच्या प्रचाराने वेग घेतला आहे. त्यातच, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह बडे नेते प्रचाराच्या मैदानात उतरले असून लक्ष्मीदर्शनाचीही जोरदार चर्चा सुरू आहे. मताला 1000, मताला 2000 असे म्हणत काही ठिकाणी मतदारांचा रेट ठरवला जात असल्याची चर्चा आहे. तर, पक्षाकडून निवडणुकांसाठी पैसेही आल्याचं सांगण्यात येत आहे. शिवसेना नेते तथा मंत्री गुलाबराव पाटील यांनी चक्क लक्ष्मीदर्शन होणार आहे, बाहेर झोपा असा सल्लाच कार्यकर्त्यांना, मतदारांना दिला होता. तर, आमदार अब्दुल सत्तार यांनीही काजू, किसमिस समजून पैसे घेण्याचा सल्ला दिला. आता, आमदार उत्तम जानकर यांनी गंभीर आरोप केला आहे.

सोलापूर जिल्ह्यातील नगरपालिकेत पैसे वाटण्यासाठी भाजपकडून 300 कोटी रुपये आले आहेत. प्रत्येक नगरपालिकेला किमान 25 कोटी रुपये, अशा पद्धतीने पैसे पक्षाकडून आले आहेत. मी 30 वर्षे भारतीय जनता पार्टीत होतो, तेव्हा राष्ट्रप्रथम हे पक्षाचे स्लोगन होते. मात्र, आता भ्रष्टप्रथम आणि मुस्लिम खतम हे नवीन स्लोगन या निवडणुकीत आल्याचा टोला उत्तम जानकर यांनी लगावला. पूर्वी अटलजींची जी भाजप होती त्यामध्ये आता भ्रष्ट लोक भरली असून पक्षाची गटारगंगा झाली आहे. पूवीर्ची तत्वे काही राहिली नसून केवळ भ्रष्टाचार एवढ्या एकाच मुद्द्यावर हे सर्व एकत्र येत आहेत, असे जानकर यांनी म्हटले. तसेच, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्यावरही सडकून टीका करत, जिथे भाजप चौथ्या नंबरवर आहे तिथे कोणाचेही पैसे घ्या आणि मत आम्हाला द्या अशी भाषा पालकमंत्री वापरत असल्याचे जानकर यांनी म्हटले. सध्या राज्यात तीन पक्ष्यांच्या सरकारचे जे चित्र आहे ते फार काळ टिकणारे नाही, यातून लवकरच मोठा स्फोट झालेला दिसेल असा दावाही आमदार जानकर यांनी केला आहे.

# दूध अनुदान वर्षभरापासून प्रलंबितच !

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील २९ दूध उत्पादक संस्थांना वर्षेभरापासून शासनाने ७ रुपए प्रमाणे जाहीर केलेले अनुदान प्राप्त झालेले नाही. या दूध संस्थांकडून संबंधित अधिकाऱ्यांकडे वारंवार विचारणा करण्यात येत आहे. मात्र, दुग्ध विकास मंत्रालयातील अधिकाऱ्यांकडून या कामांमध्ये

जाणीवपूर्वक विलंब केला जात असल्याचा आरोप होत आहे. याबाबत दूध उत्पादकांकडून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत असून दूध संस्था चालक यामुळे अडचणीत येऊ लागले आहेत. शासनाने गतवर्षी दूधाचे दर कोसळल्यानंतर पाच ते सात रुपये प्रतिलिटर इतके दूध अनुदान जाहीर केले होते. सोलापूर जिल्ह्यातील काही संस्थांना हे अनुदान मिळाले. मात्र, काही संस्थांची चौकशी लावण्यात येऊन अनुदान प्रलंबित ठेवण्यात आले. चौकशी पूर्ण होऊन याबाबतचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे. ज्या संस्थांनी योग्य माहिती दिली आहे, त्या संस्थांना अनुदान देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. मात्र, गेल्या वर्षभरापासून परिस्थिती 'जैसे थे' आहे. काही ठिकाणी आर्थिक देवघेवीच्या कारणामुळे अनुदान सोडण्यास विलंब झाल्याचे सांगण्यात येत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांना अनुदानाबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडून आठ दिवसात होईल, पंधरा दिवसात

होईल इतकीच उत्तरे मिळत आहेत. या प्रकारामुळे संस्था चालक हैराण झाले आहेत. शासनाकडून जाहीर केल्याप्रमाणे अनुदान मिळणे अपेक्षित असताना काही अधिकारी यामध्ये मलिदा मिळविण्यासाठी जाणीवपूर्वक खोडा घालत आहेत असा आरोप होत आहे. यापूर्वीही असा प्रकार घडलेला असल्याने दूध उत्पादक हवालदिल झाले आहेत. सर्व कागदपत्रांची पुर्तता करूनही दूध अनुदानास विलंब होत असल्याने तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

# सोलापूरात ई-केवायसीचा गोंधळ; सर्व्हर डाऊन आणि तांत्रिक अडचणींनी महिला त्रस्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत ई-केवायसीची १८ नोव्हेंबरपर्यंतची अंतिम मुदत असली तरी शासनाने ती वाढवल्याने लाभार्थींना दिलासा मिळाला आहे.

मात्र मुदतवाढीची माहिती मिळताच शहरातील विविध सेतु, पोस्ट, सीएससी आणि सायबर केंद्रावर महिलांची मोठी गर्दी उसळली आहे. शहरातील पोस्ट ऑफिस, सेतू सुविधा केंद्र, सीएससी सेंटर आणि सायबर कॅफे येथे महिलांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली. लाडक्या बहिणींनी लवकरात लवकर ई-केवायसी पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असल्याने काही केंद्रांवर तासन्तास प्रतीक्षा करावी लागली. अचानक वाढलेल्या गर्दीमुळे सर्व्हर डाऊन होणे, टोकन संपणे, प्रक्रिया विलंबाने होणे यामुळे महिलांत नाराजीही व्यक्त केली जात आहे. ई-केवायसी करताना महिलांना काही तांत्रिक अडचणींनाही सामोरे जावे लागत आहे. अनेक लाभार्थीनीं अर्ज करताना पतीचा किंवा वडिलांचा आधार क्रमांक दिलेला आहे. अशा प्रकरणांमध्ये आता त्या मधल्या नावाचा उल्लेख जुळण्यासाठी संबंधित पुरुष सदस्याचे आधारकार्ड जोडणे अनिवार्य झाले आहे. यामुळे कागदपत्रे मिळविण्यासाठी पुन्हा धावपळ करावी लागत आहे. शिवाय ओळख पडताळणीतील दोन अतिरिक्त प्रश्नांची उत्तरे देताना अनेक लाभार्थी महिला अडचणीत येत असल्याचे चित्र दिसत आहे. दरम्यान, ई-केवायसीसाठी वाढीव मुदत मिळाल्याने महिलांना काहीसा दिलासा मिळाला असला तरी प्रक्रिया सुरळीत न झाल्याने त्या त्रस्त झाल्याचे चित्र शहरभर पाहायला मिळत आहे. प्रशासनाने अतिरिक्त काउंटर सुरु करावेत, गर्दी नियंत्रणासाठी मार्गदर्शन करावे, अशी मागणी लाभार्थी महिलांकडून होत आहे.


# आपणही होवू शकता "मुक्त पत्रकार"

नमस्कार....,

होय, आपणही 'मुक्त पत्रकार' होवून समाजात मानसन्मानसह प्रामाणिकपणे पैसे कमवा. शेतकरी, व्यवसायिक, निमशासकीय कर्मचारी, सुशिक्षित बेरोजगार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक, मुख्याध्यापक, प्राचार्य, ग्रंथपाल, आजी माजी संरपंच, सदस्य, नगरसेवक यासह समाजाचे हित जोपासणारा कोणताही सुजाण नागरिक 'मुक्त पत्रकार' होवू शकतो. त्यासाठी १०००/- रूपये भरून सभासद (वार्षिक वर्गणीदार) होणे आवश्यक आहे. सभासदास १०००/- रूपये किंमतीची पुस्तके भेट देऊन वर्षभर अंक घरपोच पाठविला जाणार आहे. तसेच आपण द्याल ती (२ कॉलम ५ सेंमी) जाहिरात वर्षातून एकदाच दैनिक 'कटूसत्य' या वृत्तपत्रात अगदी मोफत प्रसिद्ध केली जाईल.

मग चला तर ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर 'फोन पे', 'गूगल पे' करून किंवा Dainik Solapur Katusatya, Bank of Maharashtra, AC:- 60438686652, IFSC:- MAHB0000627 या खात्यावर आपली रक्कम जमा करून सभासद व्हा. आणि 'मुक्त पत्रकार' होण्याची नामी संधी मिळवा. आपण रक्कम जमा केल्यानंतर तात्काळ ९६५७०६९०६९ या मोबाईल क्रमांकावर कळवा. रक्कम पाठविल्याचा स्क्रीनशॉट, पावती, आपल्या संपूर्ण माहितीसह अर्ज, फोटो, शैक्षणिक पात्रता, आधरकार्ड आणि subject मध्ये 'मुक्त पत्रकार' असे लिहून katusatyajob@gmail.com या मेलवर पाठविल्यास या योजनेच्या सर्व सुविधा आपणास देणे आम्हांला सोपे होईल.

**नियम व अटी:-** १)संपूर्ण माहिती पाठविल्यानंतर दोन दिवसात आपल्या मोबाईलवर डिजिटल 'जाहीरात उद्योजक' ओळखपत्र मिळेल. २) 'मुक्त पत्रकार' प्रिंट ओळखपत्र व पुस्तके पाठविण्याचा पोस्टल खर्च २००/- रूपये द्यावे लागतील. (कार्यालयात येवून घेऊन गेल्यास खर्च घेणार नाही.) ३)बातम्या पाठवू शकता. मात्र बातमी लावण्याचे व मानधन देण्याचे सर्व अधिकार कार्यालयाकडे राखीव ठेवले जातील. ४) महाराष्ट्रातील कोणीही 'मुक्त पत्रकार' होवू शकतो. ५) आमच्या विविध योजणेंसाठी जाहीराती संकलन केल्या जातात. आपण स्वतः संकलन केलेल्या जाहीरतीच्या रक्कमेवरच आपल्याला कमिशन दिले जाईल. ६) आपण पाठविलेल्या जाहिरातीवरच २०% ते ४०% कमिशन दिले जाईल. ७) सदर योजनेचे नियम बदलणे किंवा रद्द करणे या बाबतचे सर्व अधिकार दैनिक कटूसत्य व वृत्तदर्पण न्यूज चॅनल कडे राखीव ठेवले आहेत. ८) सहा महिन्या नंतर 'मुक्त पत्रकार' म्हणून 'प्रमाणपत्र' दिले जाईल. ९) मग..! चला तर, आजच 'मुक्त पत्रकार' होवूया..!! आणि कमिशनच्या स्वरूपातून पैसे कमविण्यास सुरूवात करुया...!!!

जे जे चांगले ते ते अंगिकारुया
करी होऊन पणती ! एक सुर्य निर्मूया
अंधार पळवूनी बेकारीचे ! नवे आव्हान पेलूया
हाताला काम, कामाला दाम - चला गाळूया घाम

संपर्कासाठी पत्ता

कार्यालयः दै.कटूसत्य कार्यालय, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर. फोन:०२१७३५५०५९२,मो.९७६५३९०३३९